म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २५५६

# वाजली विजेची टाळी

कांत

REFBK-0025332
REFBK-0025332

मौज प्रकाशन

मौज प्रकाशन गृह

संदर्भ काव्य
२५५६
२५३३२
१।७।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५५६
दा. क्र. २५३३२
काव्य १।७।८८
संदर्भ शाखा (ठाणे)

वा ज ली
वि जे ची
टा ळी

# वाजली विजेची टाळी

कांत

REFBK-0025332
REFBK-0025332

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५७६
काव्य

मौज प्रकाशन
मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन : ११४

पहिली आवृत्ती : २१ मे १९६५

© १९६५, वा० रा० कांत

किंमत पाच रुपये

मुखपृष्ठ :
पद्मा सहस्रबुद्धे

प्रकाशक :
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

तीं० अम्मास

आणि

रत्नांच्या टिप्परी घेऊन येणाऱ्या
तिच्या अंगाईगीतातील
रत्नकांत चिमणीस

१९६२ साली, माझा 'वेलांटी' हा काव्यसंग्रह, 'रुद्रवीणे'नंतर जवळजवळ पंधरा वर्षांनंतर, प्रकाशित झाला. पण त्यानंतर अवघ्या अडीच-तीन वर्षांच्या आतच हा तिसरा संग्रह प्रसिद्ध होत आहे. रसिक वाचकांचे प्रेम, मित्रांचा स्नेह आणि श्री० पु० भागवतांचा आपलेपणाचा दिलदार आग्रह, यांच्यामुळेच हा संग्रह आज आपल्यासमोर येण्याचा योग आला आहे.

आनंदमेघ आभाळीं
वाजली विजेची टाळी

टाळी दाहकही असू शकते याची मला जाणीव आहे; सम चुकू नये ही तळमळ आहे; आणि चुकलीच तर तुम्ही सांभाळून घ्याल हा विश्वास आहेच.

—कांत

# अनुक्रम


वाजली विजेची टाळी ३
वास ४
अशी लाट असा काठ ५
निदान ६
धुमसतें ऊन साळीच्या शेतांत ८
गाठोडें १०
एक अर्थ १२
गर्भ मी स्वप्नांचा १३
फुलपाखरू—टाचलेलें! १४
शब्दांना चिकटल्याप्रमाणे १६
खोपा १७
मावळतां शब्द १८
गोरें पान उरीं केळीचें फाटतें १९
रक्ताची शीर्षरेघ कां लागते २१
कैलास २३
कांदा २४
संबोधित २६
हिरवें गाणें २७
जखम निळी २८
किती वाजले? २९
बुरशी ३१
जळवंती धमार ३३
मत्स्यावतार ३५
कविता घ्या हो कविता घ्या! ३७
उन्हाळ्या मौनाच्या ३९
मी मस्त कलंदर गायक आहें ४०
प्रकाशाचा पदर पाण्यांत फिटतां ४१
ढळत्या रात्रीं वाकुडी बासरी ४३
गळालेलीं पिसें ४४
अंधार सूर्याने पाहिलेला ४९
अग्निपथ ८७



मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. २४५६
काव्य

# वाजली विजेची टाळी

वाजली विजेची टाळी
आनंदमेघ आभाळीं
अवकाळीं घन खळखळला
धरणीच्या वाफा विझल्या
झिमझीम तीच रक्तांत
मातिचा गंध मोदांत
नभिं इंद्र तोरणें माळी
धडकींतुन टिपरी झडली
सम प्राणांची सांभाळी !
वाजली विजेची टाळी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..........
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

## वास

होई राईंत काजळ
मावळत्या चांदण्याचें
आले निद्रिस्त फांद्यांना
कळे शुभ्र बगळ्यांचे

मूक कौलारू छप्पर
वर वाढलें गवत
वास त्यांना विचाराचा
कधी येतो पावसांत.

## अशी लाट असा काठ

सांजवेळीं मी समुद्र
चार डोळ्यांनी पाहिला
अंध लाटांस काळाच्या
फुटे पाण्यामधी डोळा

जळीं झळके साडीचा
'ॲश कलर' पदर
तुझ्या उद्भ्रांत स्मिताची
त्यास जरीची किनार

राखी झालें निळें पाणी
सांज उतरे सागरीं
खळें रुपेरी प्रभेचें
लाट क्षितिजाशीं करी

येते सागराची भाषा
काय बघशी जळांत
काय उकलती पीळ
जन्मोजन्मींचे लाटांत

शिलाखंडीं मिटे लाट
माझ्या हातीं तुझा हात
ज्यांत आभाळ माईना
अशी लाट असा काठ

## निदान

एक क्षण असा येतो
—निदान यावा—
फांदीच्या पलीकडे चंद्र नसतो
नसतें झाड नदीपल्याड
पण तुझ्यामाझ्या दुरावल्या हास्याच्या काठांनी
अनेक चंद्र मावळत असतात
उगवत असतात
सुकणाऱ्या चांदकेवड्याच्या पिवळ्याधमक रात्रींत

तुझ्या खांद्याच्या चंद्रगौर गोलाईचा
आधार घेऊन
—आठवतें तुला ?—
उभा राहिला होता
आपल्या मीलनाचा तो पहिला क्षण
आकाशाला टेकून
जेव्हा मी
पहिल्यांदा टेकले होते हात तुझ्या खांद्यावर
(आणि तुझे उरोज थरथरले
झोपलेल्या आंधळ्या कबूतराप्रमाणे
धपापणाऱ्या छातीच्या श्वासांतील वळचणींत.)

पण जाऊ दे तें
एवढेंच सांग मला
इतक्या वर्षांनंतर, अजूनही
गोरट्या कापूरगात्रांचा

पेटल्या रोमांचांचा
मोरपंखी आधार हवा का
आपल्या प्रीतीला
अर्थाला डसणाऱ्या अनुप्रासासारखा?

होय, तेव्हा—?
तेव्हा होते अनुप्रास अधरांचे
ध्वनि लावण्य-रंगाचे
बाहूंची गुंफा
बोटांची वेणी : अमृताची डहाळी
आकाश, तुझ्या गोऱ्या खुज्या खांद्यावर उगवणारें
साऱ्याचा अर्थ फक्त तुझ्या डोळ्याएवढाच खोल

सारें सारें आठवतें ग
तरीहि वाटतें—
निरंजनांत—केव्हातरी—
आपण दोघें उरतों :
अनंग—दूर—
दिशांच्या दूरतेत भरणाऱ्या चांदण्याइतके जवळ
एखादा क्षण असा येतो
—निदान यावा.

## धुमसतें ऊन साळीच्या शेतांत

धुमसतें ऊन साळीच्या शेतांत
दूर पोखरितो आकाशाला भुंगा उंच पॅगोडाच्या घंटांच्या नादांत
सावरीचा मऊ कापूस धूसर—धुकें उतरतें खाली भुरभूर
झोपलेला रस्ता थोडा शहारून मोडुनिया अंग वळे कुशीवर
रात्रीच्या काठाशी निश्चल स्वप्नाचे उसासते गाव हिरवेहिरवेगार
ओला ओला रंग—भीती वाटे मनीं—नाही ना शिवताक्षणीं पुसणार...
हातापायाविण केशरिया शेला जातो तरंगत निस्तब्ध निर्घोर
डोले लाटांवर नाव प्रश्नाकार, फेसाळ तरंग, प्रकाशाचें भिंग
फुटे खळकन् हिरव्या पाण्यांत
धुमसतें ऊन साळींच्या शेतांत...

हारवून भान रबराचें रान झाकीत जखमा झरतें झुरतें
सुस्त हॉटेलाच्या काचेरी डोळयांत रात्रीची गुलाबी मस्ती तवंगते
रतिक्लांत गात्राची तृप्तीच्या डोलाची लवथव श्रोणींची हळू हारवते
'बुद्धं सरणं संघं सरणम्'—गप्प गोपुरांना प्रार्थना फुटते
सणाणतां गोळ्या प्रार्थनागीतांच्या मंद घोषांचा तो पाखरांचा थवा
उडे दचकुनी सैर आभाळांत
धुमसतें ऊन साळीच्या शेतांत.

चव्हाट्यावरी ये केशरी कफनी 'बुद्धं सरणम्' गर्जत गर्जत
भरकन तेलाची वरसते धार जळते उन्हांत केशराची ज्योत
मदांध सत्ताही आपुल्याच गोळया पोटाशीं धरून कोसळे राखेंत
काळाच्या दात्यांत रुते धर्मचक्र नभा हौतात्म्याचा अर्थ विचारीत

बुद्धाच्या दगडी वरद मूर्तीची फुटकी भिवई आशंकेने हाले
कशास मानवी अट्टाहास सारा बोधीवृक्षापोटी प्रश्न हा जळे
प्रज्ञा-करुणेचीं चकित हरिणें मृगवनांतील प्रवचनांतून
बावऱ्या दिशांत पळून जातात
धुमसतें ऊन साळीच्या शेतांत.

## गाठोडें

[ऑर्थर सीटला अर्पण]

तुटलेला कडा काळ्या पाषाणाचा
        अथांग दरीची पाताळ-जांभई
अपूट प्रकाश झिरपे पहाटे
        दुधाळ ऊन अन् कुठे उतूं जाई

हास्याचे तुकडे शुभ्र अभ्रखंड
        येती तरंगत निळ्या धुक्यांतून
उन्हाने पेटती—हळूच तयांना
        अवखळ मन गेलें का शिवून ?

सांजतां धुक्याच्या तलम लहरी
        होऊन अजस्र लाटा उसळती
झाकुनिया रानें लपेटुनी दिशा
        फुत्कारत लोळ धूसर धावती

लळ्लळ धुक्याच्या प्रलयाच्या जिभा
        झाडाडोंगरांचा करूं येती घास
अंधारल्या दिशा घोंघावती वारे
        पुसला सूर्याचा, आकाशाचा स्पर्श

सृष्टीचा पसारा आवरण्याची ही
कुण्या खेळियाला अशी त्वरा झाली ?
बांधून धुक्यांत पृथ्वीचें गाठोडें
कुठे त्याची स्वारी घाईत निघाली ?

## एक अर्थ

कुणीसं म्हणालं, संपलं—मेली ती !
खरंच ? अरेरे ! कोण हो होती ती ?
कुणास ठाऊक ?
कुणाची बहीण, कुणाची प्रेयसी
कुणाची मुलगी, कुणाची आयशी
एखादें फूल कबरीवर मागे
सारवल्या जागीं एक दिवा जागे
निःश्वास सुटतो एक आसू गळतो
मुर्दाड मनानं माणूस चालतो
डांबराची वाट—
कासवाची पाठ !
पाण्यांतली राख विर्घळली नाही
तोच यांना झाली विसरायची घाई
—ईश्वर पुन्हा एक माणूस घडवतो
विश्वाचा नवा अर्थ लावीत बसतो.

## गर्भ मी स्वप्नांचा

शिरीचें आभाळ
शिवतच नाही
पायाखाली भुई निसटते

बिनचेहऱ्याची
गरदी घामट
आंधळ्या वाटांत लोटी मज

नियतीच्या काठीं
गर्भ मी स्वप्नांचा
कुमारी इच्छेचा सांडलेला

## फूलपाखरू—टाचलेलें !

पाठीसारखा खारीच्या
काळा-पांढरा रस्ता चपळ
ऐट उन्हाची नायलॉनाची
कुठे लाचार हसे चिखल

उंच इमले दोन्हीकडून
दगडी छाया घसरत येई
हसरा हिर्वा ओल्या पानांचा
कवळा स्पर्श तिच्यांत नाही

माणूस बोले, "आम्ही चालतों"
नेतो रस्ताच त्याला ओढून
"आम्हीच पाय आम्हीच गति"
फाटका जोडा म्हणे हसून

गाठ निसटे चेंगरे कोणी
रक्त पाण्याने धुवून जातें
आकाश तोलूं देवांसहित
अशा तोऱ्यांत क्रेन डोलते

धावती लोक कर्कश भोंगे
त्याला धुमारा फुटे धुराचा
मातीच्या ओठीं सिमेंट गच्च
चिणला हिरवा क्षण गवताचा

फुलपंखी वर निश्चल नभ
फुलपाखरू की टाचलेलें :
ओढ फुलाची तृषा मधाची
झेप प्राणाची हारवलेलें

## शब्दांना चिकटल्याप्रमाणे

नसतेपणाची निळाई पिऊन
आकाश मस्त असतें
असतेपणाचा आव आणीत;
भणंग वारा
पानांच्या कातरसावलींत
कातरीत बसतो चुकलेले स्पंद
श्वासांमधल्या धुकाळ प्रबंधाचे;
ढगाळ तळें
प्रतिबिंबांत ओकूं पाहतें
काठावरचा न पचलेला अनुभव काळानिळा.

पण पलीकडे—
उन्हाच्या चतकोर तुकड्यांत
पाणवलयांच्या सोनसाखळ्यांत
त्यालाही अर्थ येतो :
नहाल्या गोल वक्षाचा
मुसमुसणाऱ्या चाफ्यांचा
सूर्यावरील डागांचा
ओल्या वस्त्रांत हारवणारा
आपल्या नग्नतेसह : शब्दांना चिकटल्याप्रमाणे.

## खोपा

ज़र्द शेवंती फुलली
तुझी आठवण गोरी वाऱ्यांतून मुसावली
कसे सायलीचे कळे
तुझें मौन मोडायाचें सांजेसाठीच थांबलें
चंद्र निंबोणीखालती
आली तृप्त नजरेची साय चांदण्यावरती
तुझ्या बासरीचा स्वर
येतो रात्रीच्या क्षणाला पिक्या द्राक्षांचा बहर
आलें तोंडावर ऊन
पडे निद्रेच्या काठाशीं खोपा स्वप्नाचा मोडून

## मावळतां शब्द

मावळतां शब्द वाघुळें उडालीं
पिसें काळोखाचीं अर्थास फुटलीं
चंद्राच्या फळाला कीड झळंबली
तुटलें जांभूळ झाडास लागलें
तेंव्हाच तुटलें
लावण्याचें फळ सत्याच्या देठीचें
सल द्रौपदीचे उरांत लपले
कुंकू पांघरून;
अन् ओव्यावरी
यमास सत्याचें वाण मागणारें
सावित्रीचें मन
पाऊसधारांत
वडाच्या पानांत
भिजतें, भिजतें.

## गोरें पान उरीं केळीचें फाटतें

जळाच्या नाजुक सोनसाखळ्यांत
रंगीत रेशमी धुक्याच्या शेल्यांत
स्वरांच्या बाहूंत
मादक स्पर्शाच्या रोमांचपाशांत
दुखरें अपुऱ्या कहाणीसारखें
मर्मांत सलतें
गोरें पान उरीं केळीचें फाटतें.

तांबडेपिवळे गुलाब फुलले
निरशा उन्हाच्या दुधांत नाहले
आक्रोशतें कोण ?
पुष्पदळांमागे काय अजराजा ?
इंदुमतीचें का फुलांचें मरण
पाकळ्यांच्या काठीं
उन्हांत फिरतें ?
गोरें पान उरीं केळीचें फाटतें

कीर्तीचें निशाण नक्षत्रां भिडलें
सोन्याचें कणीस मोत्यांनी पिकलें
स्वातंत्र्यदीपाने युगान्त उजळे
परी पलीकडे ज्योतींच्या रेषांच्या
स्वरांच्या पल्याड विजयगीतांच्या
अज्ञात बळीच्या विझल्या चितेची
जळत्या रक्ताची

उग्रगंध धग
नव्या तोरणाला जगाच्या शिवते
गोरें पान उरीं केळीचें फाटतें

## रक्ताची शीर्षरेघ कां लागते

रक्ताची शीर्षरेघ कां लागते
अजूनही काळ्या अक्षरांना ?
मिसिसिपीच्या पाणरेघेच्या भांगेत हा गुलाल कसा उधळला ?
पुळणींतील मगरीच्या हिंस्र हिरव्या डोळ्यांत
हे कसले प्रतिबिंबाचे भोवरे गरगरत आहेत ?
व्हिस्की पिऊन ओकत आहेत
शंभर इमल्यांचे काचबंद झिंगले महाल
झेपावत आहे धगधगता अग्निबाण
आकाश झळाळीत, नक्षत्रांच्या गर्दीतून :
कधी रमणीच्या स्मितासारखा
तर कधी मरणाच्या मेण्यासारखा
काळें नग्न प्रेत, झाडाला लोंबणारें
वटारलेल्या डोळ्यांत जळालेलें स्वप्न गौरांगीचें
एकांतांत फुटणारा रेशमी झग्यांतला गोरा हुंदका :
चंद्रकोरीसारखा
फुलांच्या डोळ्यांची हसणारी वाट
पांढरेंशुभ्र विद्यामंदिर
पाद्र्यांच्या परीटघडीच्या झग्यासारखें
बंद फाटक संगिनींच्या गजांनी
समोरून आंत डोकावणारीं दोन काळींसावळीं मुलें
बाजूस उभे खिळ्याचे बूट, पोलादी टोप्या
चकचकते बिल्ले, शिसवी दंडुके उगारलेले
भिरभिरत बघती भोळे डोळे
(काळ्या बदामाचे) चाचपीत दप्तरें

परंतु त्यांना कळत नाही
'ए बी सी' चीं अक्षरें सॉक्रेटीसाने प्यालेल्या विषाने काळवंडलीं आहेत
बीजगणिताच्या आंकड्यांतून
गॅलिलिओला जाळणाऱ्या चितेचा जाळ भडकला आहे...
कुंडींतील फुलांतून गोळ्या पेरल्या आहेत.
पाटीदप्तरें (त्यांना कळलें नाही)
त्यांच्या काळ्या देहांसह कुरळ्या केसांसह उधळलीं आहेत
रक्त पसरलें शाळेच्या वाटेवर
अर्भकासारखें निष्पाप;
आणि क्षितिजावर
तळपत्या उन्हांत
बर्फाच्या भुरभुरल्या मोतीचुरांत
फिरतो आहे, लोंबतो आहे एक तुटका अंगठा :
एकलव्याचा !
ज्ञानलालसेचा कापलेला लसलसता अंकुर
अपमानित वंचित आकांक्षेचा कोवळा कोंभ
खंडित बुद्धीची शोककथा
रक्ताने ठिबकणारा
क्षितिजावर लोंबणारा
एकलव्याचा अंगठा !
त्या पांढऱ्याशुभ्र विद्यामंदिरासह
मिसिसिपीतील मगरीच्या हिरव्या डोळ्यांत बिंबला आहे
अन् विचारून राहिला आहे :
अजून काळ्या अक्षरांना रक्ताची शीर्षरेघ कां लागते ?

# कैलास

शहारतां सांज गुलाबी ढगांत थंडीच्या दिसाची
स्तब्ध रंगखुळी गोरीमोरी खाडी बिलोर ऐन्याची
'कॉज़्वे' भाबडा शेवाळी हासत जरा जळीं जाई
आरशासमोर थबकल्यागत उगा उभा राही
लपवी नवोढा नवीन उभारी ओढून पदर
उठे-न-उठेशी घडी रेशमाची निळ्या जळावर
टेके सूर्यबिंब : सोन्याची ताटली पाणरेघेवर
पोलादी मिन्याचें शिल्पित छायेचें झाड सूर्यावर
पाहतां ही नक्षी डोळे झाले साक्षी कशाला-कशाला ?
चाविलेली शेंग दिलीस—एवढें आठवे मजला
तेव्हा त्या शेंगेने कोरिला कैलास श्वासनिःश्वासांत
मीठ आसवाचे रंग अबोलीचे सांजती ढगांत.

## कांदा

अंकुरला
एक कांदा विसरलेला
प्लॅस्टिकच्या परडींत
लवलवती पात
इवली धारदार :
हिरवागार उंच सूर बिलासखानी तोडीचा
दुखत्या हृदयगोडीचा,
असा टाका उसवणारा
सभेवरती डोलवणारा कफन तानसेनाचें !
लसलसता कोंभ
प्लॅस्टिकच्या परडींत—
मातीची कूस त्याला लाभली नाही
आभाळाने सावली धरली नाही
पाण्याची ओल शिवली नाही
तरी तरारून
"पण असाच फुटतो
अनंताचा कोंभ
मरणाच्या उलक्या पिंपळाला"
कुणी बोलला
अकलेचा कांदा विसरलेला !

तेव्हापासून
वाळली पात
सापाची कात
हालते उघड्या वारुळाच्या तोंडीं

## संबोधित

तारांवरून धावती
थेंब सरीचे निःशब्द
त्यांना जीवनाची धारा
कधी सापडली नाही

घुमे पारवा कोनांत
उडे काळोखाचा रवा
त्याच्या शब्दीं 'संबोधित'
कधी गवसलें नाही

# हिरवें गाणें

हिरवेंहिरवें रान माझें हिरवेंहिरवें गाणें
हलतीं-झुलतीं हिरवीं पानें शब्द कापरे रुमझुमणारे
लालकेशरी अर्थ फुलांचे सगंध हासत हारवणारे
निळा स्पर्श वाऱ्यांत नभाचा गवतांतुन संतूर-तराणे
हिरवेंहिरवें माझें गाणें

फुलपंखी दे उन्हांत ठिपके पिसांत डोळे उघडी मोर
झाडावरती गातो पक्षी चोचिंत त्याच्या पिकतो सूर
मधुकण झरते त्या गाण्यांतिल धरुनि ठेविती दवांत रानें
हिरवेंहिरवें माझें गाणें

पिवळीं पानें धुरकट रानें मोहर सगळा गेला जळुनी
पिसें गळालीं चोचहि झडली गेला पक्षी गाणें ठेवुनि
त्या गाण्यांतिल मीठ अश्रुचें पानझडीमधि जपती पानें
हिरव्या जखमा हिरवीं रानें
हिरवेंहिरवें माझें गाणें

## जखम निळी

उडे उन्हाचा पदर जरीचा
जलधारांतुनि कसा
जागृतींतुनी स्वप्नामधलें
हास्य तुझें राजसा

दबकत येती तव आठवणी
व्याकुळल्या अंतरीं
खिन्न तमीं जणु रात्रीं वाजे
पाउस पानांवरी

—आणि पहाटे दचकुनि उठतां
साखरझोंपेतुनी
रित्या घनाचें विकल सुनेपण
जखम निळी करि मनीं

## किती वाजले ?

समुद्राच्या काठांनी रात्र उतरते
झाडांत टॉवर डोळे उघडतें
फिरवीत काटे टुकुटुकु बघतें;
जवळून कुठे
आठ पस्तीसची लोकल धावते
उडतें वाघूळ तिला विचारतें
किती वाजले ?—
आणखी उंच झाडावरती
फिरून स्वतःला टांगून घेतें.

'किती वाजले ?'
सावरीत पदर ती हळूच पुसते
समुद्राची लाट पायाशी फुटते
तो तिच्या बोटांत बोटें गुंफतो
दोघांच्या डोळयांत समुद्र चढतो
कुलफीसारखी विरघळत गोड
मुकाट वाळू खुसखुस करते

किती वाजले ?
टिकटिक घड्याळ काय वेळ सांगेल ?
झुऱ्याबावऱ्या हृदयाच्या धडकींत
समुद्रपोहत्या काळजाच्या ठोक्यांत
नावहाकारत्या वल्ह्याच्या ठेक्यांत

शिंपल्याचे क्षण
अपारांत गाजल्या समुद्रतेचे क्षण
चंद्रांत कोरतें
वाळूंत लोळणारें कलंदर मन...

उगीच वेडे फिरवीत काटे टॉवर विचारतें
किती वाजले ?

## बुरशी

पावसाळ्याची एक दुपार
वारा गार
पाण्याच्या मनांत ढगांचा भार;
ताडमाड मान डोलते
काचबंद लाट फुटते
फसवेंफसवें ऊन हसतें
सूर्याचें फळ पिकून गळतें—समुद्रांत पडतें!
वाऱ्यांत पृथ्वी भरकटत जाते
कुठे? कशाला?
विचार घुम्या ध्रुवताऱ्याला!

गरगर गरगर दिवस फिरतात
रात्री फिरतात
या दोहोंच्या फिरत्या पाळूंत तारे राहतात
मग त्यांचें पीठ
कां नाही होत?
अनंततेची ती जाहिरात:
'निऑन' लाइटच्या जळत्या अक्षरांत

दिवसा आभाळ खोटें बोलतें
अंधारात रात खरें पुटपुटते
तेव्हा कोणीच जागें नसतें

दिवस उगवतो
माणूस उठतो
कांहीतरी स्वप्न पाहिलें म्हणतो
आंबल्या अंगाने जांभई देतो
पृथ्वीसारखी गोल गोल !

आंबलेलें मन मात्र म्हणत राहतें
ढगाळलेल्या आभाळाला
भिजून भिजून बुरशी आली
पावसाळयाच्या या दिवसाला

## जळवंती धमार

लोहचुंबकाची पाण्याला ओढ!
डळमळे नाव सुसाट धारेंत
वेगांत वल्हीं मारिशी नावाड्या,
दोन्ही बाहूंत वळूनिया बळ
साऱ्या प्राणाचें;
मोडते न लाट, तुटतें न पाणी
बलदंड बाहू पिळती वळती झुंजतां लाटांशी,
निथळे घामाने तुझें ओलें अंग;
आदळती भोती हिरव्या फेसाळ शिळंधार लाटा—
चिंबल्या जिवांचा घाबरा गलबला
भीतीची किंकाळी कोंडलीसी गुहेंत: हिरवी हिरवी!
हालती फक्त तुझे दोन हात
वल्हीं वाजतात
एका कोपऱ्यांत गातों मी उदास डोलत्या नावेंत...

कां रे हासतोस नाविका, असा?
कापऱ्या कंठांत उमटला सूर:
चाफ्याच्या वाळल्या डहाळ्यांतुनी
सुगंधी सोनेरी फुलांची लकेर
हासतोस कां रे?
अरे हेच सूर (कुणास माहीत?) रेशमी दोऱ्यांनी
बांधीत असतील
ओढीत असतील
तुझ्या या नावेला

दूरच्या अदृश्य अक्षय काठाशी
पुरापलीकडे—पैल वादळाच्या,
मुक्त कलंदर आळंशी माझ्या गळ्यांत उगीच
सुरावतें गाणें;
घुमे घुमघुम
वल्ह्याचा तुझा पाण्यांत मृदंग :
जळवंती धमार !

## मत्स्यावतार

कोरडा अंधार
चौपाटीवर उडतो भुरभूर
मऊ काळ्या वाळूसारखा कोरडा अंधार
कोरडा अंधार !
पुळणीवरती अफाट शहर
देवमाशाचें विद्ध कलेवर
डोकें त्याचें 'मलबार हिल'वर
घारापुरीच्या त्रिमूर्तीवर
शेपूट उडतें—
असें अजस्त्र विद्ध कलेवर
पाण्यावेगळें तडफड करतें—
दिव्याचे पट्टे पाऱ्याचा प्रकाश
नवलाएवढे
पोटावरचे चांदीचे खवले !
चमकत राहतात
ठणकत राहतात—
धपापणाऱ्या त्या खवल्यांत
उजळणाऱ्या खिडक्याखिडक्यांत
हजार हसतात हजार रडतात :
वेड्यासारखी
काळोख फिस्कारीत !

सोन्याची धार दारूच्या प्याल्यांत
खुर्चीचे पाय सत्तेच्या कैफांत

नाचतात 'जाझ' हॉटेलच्या आरशांत
घरें गिऱ्या घेतात गोऱ्यागोऱ्या पिंढऱ्यांत
किरणोत्सर्गी लपली आग
रंगीत-संगीत दिव्यांच्या झोतांत
'बटाट्याची चाळ' कोसळते हास्यांत
फूटपाथवरचीं प्रेतें झोकांत
तिकिटें घेऊन हा खेळ पाहतात !
विदूषक मात्र शेपटी हालवीत
देवमाशाच्या हसतो पोटांत
उधळत येतो या सर्वांवर
कोरडा अंधार
कोरडा अंधार

## कविता घ्या हो कविता घ्या !

कविता घ्या हो कविता घ्या
युगायुगाचा गीतविक्या मी 'सबकुछवाली चीजें' घ्या.

काव्यकलेला मोल हवें ना
सत्यालाही ढोल हवे ना
नसल्यालाही बोल हवे ना ?
पहा वाणिचा तुकेल बागी गरम वाणिचा हुरडा घ्या
कविता घ्या हो कविता घ्या

नवें वाण इष्काचें बघतां ? भावगीत घ्या गजला घ्या
यांत कालचे हुंद्के फुटती
शपथा ओठीं पुसून जाती
लिपस्टिकचे अन् रंगच उरती
स्वेदकणांनी न्हालेलीं हीं फळें 'शरीराबादी'* घ्या
कविता घ्या हो कविता घ्या.

क्रांतिगीत का हवे ? पहा मग गरमगरम हीं गाणीं घ्या
सत्तेच्या पदिं जीभ वाहिली
शब्दांतुनि बंडें रसरसलीं

* या ठिकाणी वेगळ्या संदर्भांत आलेल्या एकनाथी भारुडातील जिवाजी कुळकर्णी कसबे कायापेठ याची आठवण व्हावी. मौजे 'शरिराबाद' त्याच्याजवळच कुठेतरी आहे, हे तो अध्यात्मिक भूगोल जाणणाऱ्यांना सांगणे नलगे !

शहीदसरणीं भाजूं पोळी
येळकोटभंडार उधळला हळदीचीं रणगीतें ध्या
कविता ध्या हो कविता ध्या.

शब्दांचा मी भोप्या गर्जें ढाक-पवाडा लावणि ध्या
धर्मगृहांतुनि, राजपथांतुनि
परमार्थाच्या पेठेमधुनी
विकिला आत्मा, विकलीं गाणीं
पोत करांमधि गळ्यांत कवड्या गोंधळ ध्या गणगवळण ध्या
कविता ध्या हो कविता ध्या.

## उन्हाळ्या मौनाच्या

चांदण्यावरती
दोन काळ्या रेषा वाळल्या फांद्यांच्या
उन्हाळ्या मौनाच्या !—
शब्द—पान-पान लुंचून हातांनी
विरक्त उभ्या शून्याच्या कांठाशी;
स्पर्शतो, हर्षतो
अदृश्य अर्थ
फडफडत्या तडफडत्या वाऱ्यासारखा
वाऱ्याच्या संगती
बोडख्या झाडांत;
मुळाशीं मात्र
दगड झालेला फुलाचा अनुभव
पुटपुटे पिवळा मातीच्या ओठाशीं :
बरें झालें देवा
बडबडगीतें पानांचीं झडलीं :
उरल्या केवळ चांदण्यावरती
दोन काळ्या रेषा अनादि मौनाच्या
अंकुरण्यापूर्वी शब्द—
आकाश !—

## मी मस्त कलंदर गायक आहें

मी मस्त कलंदर गायक आहें
रित्या जगाचा रित्या क्षणाचा मी मस्त कलंदर गायक आहें.

मनचें माझ्या आभाळीं उडालें
म्हणे तारामंडळ त्याचेंच झालें
रित्या क्षणाला प्राणाचें ओज देत शिंपल्यांत मोती घडवीत आहें.
मी मस्त कलंदर गायक आहें.

झाडांना रानीं फुलें लाललाल :
लाखलाख देठासकट उषःकाल
हजार पाकळ्या शोधीत त्यांच्या दिवस रात्रींत चालत आहें.
मी मस्त कलंदर गायक आहें.

डोंगरांत झरे खळखळत आले
त्यांत माझें मन ओघळून गेलें
ओढ्याच्या ओढीने वाहतां वाहतां समुद्राच्या काठीं लागत आहे !
मी मस्त कलंदर गायक आहे.

पायाखालची वाट तर संपत नाही.
नक्षत्रांनी झोळी कांही भरत नाही
रितेपणा मात्र वाढत वाढत आकाश पोटांत साठवीत आहे !
मी मस्त कलंदर गायक आहें.

## प्रकाशाचा पदर पाण्यांत फिटतां

शुभ्र निळें कांही
काचेचें भांडें
तृप्तसें होतें जांभई देत
पाण्याने भरून;
पन्नास वर्षांच्या सुस्त लाकडी मख्खपणाने
उभें सावरीत
टेबल आपलें वेडें अष्टकोण!
वर विजेच्या दिव्याच्या झोतांत
संथ पाण्याच्या काचबंद कुयरींत
गोल जांभईच्या काठाकाठांनी
फिरत होती
इवलीइवली सोनेरी मासळी :
धरीत होती जाळबुंदी फेर
आरुणी माणिक-कोंभासारखी
विझत पेटत!
उठवीत लाटा अंगासरशीं
तलम सोनसळ्या;
गरगरत होती
फिरत होती तिच्याबरोबर माझीही नजर
धुंद लालसर—
जास्वंदी रेघ : फुलांची शराब प्याल्यासारखी—

पाहतां पाहतां
प्रकाशाचा पदर पाण्यांत फिटतां!—

थोडा पलीकडे
माझा देह माझ्याच समोर
सोनेरी कापूरज्वालेसारखा
उभा राहिला पेटून थेट !—
अन् तसाच विझला...

माझी नजर (वेढून अंतर)—
टेबलावरच्या अकलंक पात्रांत
मीच ओढून टाकलेल्या थंड
सिग्रेटच्या राखेंत—
शोधीत बसते, चाचपून पाहते
पन्नास वर्षांचे उद्ध्वस्त अरुण !...

इकडे मात्र काचेच्या भांड्यांत
इवलीइवली सोनेरी मासळी
सारी रात्र फिरत राहते
गरगरत राहते गोल गोल
जांभईच्या झिळमिळ सुस्त काठाने
ओल्या माणिक-कोंभासारखी
विझत पेटत.

# ढळत्या रात्रीं वाकुडी बासरी

ढळत्या रात्रीं वाकुडी बासरी, शब्दांच्या तीरीं मी घुमवीत आहें
अन् मस्त गाणें रित्या क्षणांचें छेडीत वर्षें तुडवीत आहें

खडखड गाडा
धुळीचा वेढा
वाळला ओढा :
गाणें ओढितो घसा कोरडा
मध्यरात्रीच्या चांदण्यांतले मृगजळ लहरा मारीत आहे
रित्या क्षणांचें अन् मस्त गाणें छेडीत वर्षें तुडवीत आहें

बासरी माझी वीतभराची
अशाच एका रित्या क्षणाची
अन् त्यास भोकें सात सुरांचीं
माझ्या रोजच्या साती दुःखांचीं
फुंकुन मी प्राण त्याच सुरांतून आनंदाची धून भरीत आहें
रित्या क्षणांचें अन् मस्त गाणें छेडीत वर्षें तुडवीत आहें

हे सूर माझ्या श्वासांमधले
शोधीत अर्थास दूरांत गेले
घेऊनिया मींड परत आले
फिरून मलाच शोधूं लागले
मी मात्र माझ्या गाण्यांत आता मिठासारखा विरत आहें
रित्या क्षणांचें अन् मस्त गाणें छेडीत वर्षें तुडवीत आहें

## उत्तर

हीच काय सखे
प्रीतीची अखेर
असें कुठवर
जळायाचें

उत्तरांत तिने
खट्याळ हसून
दीपच फुंकून
मालविला.

## खाणी

एकच तूं सूर्य
सहस्र वर्षांत
आकाशा, शून्यांत
निर्मिलास

परी ती धरित्री
निर्मि मातीतुनी
नित्य नव्या खाणी
रविचंद्राच्या

## अब्रू

प्रियेचा उंबरा
असो देवद्वार
लवतांच शिर
अब्रू गेली

## टिऱ्या

चिखलाच्या टिऱ्या
वाटे घळतील
सांभाळून चाल
गजगमने

## कृपा

जळे फुलबाग
कृपा ही काळाची
उरांत हारांची
सलें झालीं

## बरें झालें

मशीद; मंदिर
उध्वस्त बघून
जिवा समाधान
वाटलें गा.

बरें झालें देवा
तुमचेंही घर
मोडलें लाचार
माझ्यापरी.

## फोड

व्याकुळलों बापा
फोड आले पायीं
अंग झालें लाही
चालतांना

परि पुढे वाट
काव्याची पाहून
मोहरलें मन
आनंदाने

## राख

हृदयाची राख
झाली रे जळून
मज ये कळून
एवढेंच

नाही मी पाहिला
जाळ पेटलेला
धूर उठलेला
कधी डोळा.

## वेदना

वेद वेदनेचा
होईलच कधी
समर्पण आधी
जन्म व्हावा

होण्याआधी स्पर्श
तुझ्या कुंतलांचा
श्वास संपायाचा
कुडींतील

## सावली

क्षुद्र मूर्ख मना
कसे दिन आले
नवल वर्तलें
उन्हामाजीं

इवलालीं खुजीं
माणसें जहालीं
सावली लांबली
त्यांची काळी

## पवित्र

अधिक पवित्र
तुझा दारवंटा
किंवा माझा माथा ?
सांग देवा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५५६
२५३३२
काव्य



# अंधार सूर्याने पाहिलेला

महाभारतातील ययाति-आख्यानाच्या कथेवर हे काव्य आधारले आहे खरे, परंतु ययातीची व्यक्तिरेखा रंगवण्याच्या बाबतीत, महाभारतकारांकडून मी मनसोक्त स्वातंत्र्य घेतले आहे. ययाती जसा मला दिसला, भावला, आकारला, तसा मांडला आहे. मला तो ययाती मुक्तपणे, निर्भयपणे जीवन जगू न शकणाऱ्या, आपल्या भावनांशी, अनुभवांशी आणि श्रद्धांशी इमान राखू न शकणाऱ्या आणि भीतीने व आगतिकपणे घरंगळत जाणाऱ्या माणसाची प्रतिमा भासला. कदाचित हे ययातीचे चित्रण नसेलही,—त्याने मनावर केलेल्या परिणामांचेही ते चित्रण असू शकेल. दुसरे : पौराणिक प्रतिमा (Mythical Image) कोरण्याचाही हा खटाटोप नाही; कारण हे चित्रण केवळ प्रतिमेत गुंतत नाही. त्या प्रतिमेचा भेद करून ते पुढे जाते, त्यासाठी धडपडते, असे मला वाटते.

काव्याचे निवेदन पत्ररूप आहे. खाजगी पत्रात माणसाच्या अंतरात्म्याची खरी कुजबुज ऐकू येते असे काही लोक म्हणतात. ती कुजबुज पकडावी असा 'घाट' रचून पाहिला आहे. साधला की नाही हे रसिकांनी ठरवायचे.

प्रिय पुत्रा, पुरू,
हे आलेंच संपत—पत्र नव्हे—तेल
या सुवर्णदीपांतलें कुसुमगंधित
निशिगंधाच्या स्वप्नसुवासें,
विझूं पाहे वात जागून शिणली रात्रभराची
देई जांभई म्लान ज्योतीची, श्रांत हळदिवी
थकलों मीहि, आली मलाही हलकीशी जांभई
रसमत्त गात्रें सहस्र वर्षांचीं—जुनींच तशीं हीं—
फेसाळलेल्या माणिकधारेच्या लवथवत्या काठाशी बेहोष क्षणांच्या
दुखती कधी, कधी ठणकती
चिरतारुण्याच्या वरदानाने
तेल संपतें
या माधवीच्या डोळ्यांवरली
उडते नीजही
सरते सावली रात्रीची रेशमी : श्वासासारखी
जळांत झोपल्या नीलकमलांहुनी
संपलें पाहिजे हें—
संपण्यापूर्वी तेल दिव्यांतील
झोप डोळ्यांतील माधवीची.

माधवी कोण ही ?
स्मिताची रेखा मृत्यूच्या ओठींची !
माधवी म्हणजे—पण थांब, पुरू
सारेंच सारेंच सांगायचें आहे

ऐक आधी परी—
गळाली आहे माझी सारी भीति
गळाल्या वर्षांच्या फूलपाकळ्यांत
जात आहें मी सामोरा मृत्यूला
मृत्यूच्या पुढ्यांत गळे सारी भीति :
रतिसमयींच्या ओघळणाऱ्या वस्त्रासारखी

लिहीत आहें मी मृत्यूच्या दारांत
उल्कापाताच्या हसऱ्या भाषेंत
पानझडीच्या पिकल्या शब्दांत :
सरतें आहे माझें सारें भय
भय मरणाचें, वार्धक्याचें भय
सरतें परतें सिंधुवेलेपरी, हास्याचीं फुलें तरंगभंगांत
उरीं तडकला चंद्र हासताहे
कलंकरेषेंत
पौर्णिमेच्या रात्रीं क्षयाच्या क्षणीं :
अमृतवेळा ऱ्हासाच्या मुहूर्तीं !
तसें सरो भय,
म्हणून वत्सा, लाडक्या पुरू
नको विचारूं कांही कांही आता
परत दे रे माझें वृद्धपण
स्वीकार आता माझें तारुण्य
वार्धक्य माझें परत दे मला.
शुक्राचा तो शाप

वर्षो मजवरी झंझावातापरी
थंड शिशिराच्या हिमलाटेपरी
पानांचें लावण्य, फुलांचें तारुण्य खुडून नेणारा
यौवनरसकुंभ सांडीत जाणारा
झडपीत येवो शिशिरवारा दुर्धर शापाचा
स्वागत करी हा जीवनवृक्ष
पसरून बाहू सहस्र वर्षांचे,
स्वागत स्वागत.

वत्सा पुरू, पत्राच्या घडींत
पोचवीत आहें निरभ्र ठेव तुझ्या तारुण्याची
क्षमा करीं मला
भीरू लंपट निर्लज्ज पित्याला
भ्यालों मी जरेस, भ्यालों मरणास
भ्यालों सौंदर्यास, भ्यालों मी प्रीतीस
भ्यालों कर्तव्यास, भ्यालों जीवनास
दिलें नि भीतीस विलासाचें रूप
प्रीतीच्या प्याल्यांत जीवनाचा रस
होतो कालकूट—कळलें नाही
कळलें नाही.

पडेल पत्र जेव्हा तुझ्या हातीं
झाकील मृत्यू माझी लाज, भीति
बाळा, वाच पुढे

नको अडखळूंस
खोडिलें घाईंत नको तें अक्षर
परंतु काळाच्या भूर्जपत्रांतला कोण रे खोडील
जीवनाचा माझा अभद्र लेख ?
शापाने वराने शुक्राचार्यांच्याही नाही पुसणार
क्षण, मात्राही !

पहा तो कूप
दाहक विषाचा की अमृताचा—
कशाला हा प्रश्न आता अंत्य वेळीं ?
दिसते अजून, लालस डोळा :
भरतें नीर निर्जल कूपांत
शतोत्पलापरी ऋषिकन्यका ये जळामधून
फेनिल लाटांचा पुष्पांचा झूला
अवतरे लक्ष्मी उधाण सिंधूच्या आनंदलहरींत
तशी देवयानी आली कूपांतून.
मंतरलेल्या माझिया बाणाच्या हिंदोळ्यावर
झालीं त्या क्षणीं बाणांचींही फुलें—
लाजे पुष्पधन्वा !
उडी घेई खाली कविकन्या ती
माझ्या हाताचा घेऊन आधार हासत हासत :
उतरे मनांत अर्थ शब्दांतून
होऊन हासू फूल देठांतून—

" नाही दिला हात असा सोडायास."
बोलली सस्मित जास्वंदी लाजत
हात सोडितां मी
दबतां अंगुली, तनु लहरली
उंच उसळती रक्तोष्ण लाटा
पायतळीं धरा सरकत जाते
ठिबके मनांत चंद्राचें चांदणें
फुलती हृदयांत लक्ष लक्ष फुलें
थरथर कापे रोमांचित कर
परंतु कांही बोलला नाही तो
धुंद रासवट पालवी स्पर्शाची
करकंपनीं फक्त :
नव्हती भाषा, नव्हते त्याला शब्द
कांहीच नव्हतें मनांत माझ्या.
अगाध विस्मय चकित मनीं सौंदर्यस्पर्शाचा
विद्युत्पुष्पांची दाहक उमलण, पोळता परिमळ
अद्भुत ओढ गात्रांची गात्रांस
नसांनसांत पद्मपाकळयांचें सुखद मऊ प्रचंड वादळ
उडवून नेणारें देहास देहापासोनी
अबोध भय दाटलें मनांत रूपप्रलयाचें, देहस्विनीचें
परी माझ्या ओठीं एकही शब्द उमटला नाही
भीतीची या प्रीती झालीच नाही—
कधीच नाही.

नकाराची भाषा मनींच राहिली
आकाशमिठी मातीला जडली
भृंग पद्मकोषांत विजेच्या गुंतला
घालूं लागला रुंझी अंधारांत, स्पर्शकोमल
असोनी भोवती देवयानीच्या देहाचा उजेड !
शरांस भीती शुक्राच्या शापाची
क्षणांस भीती देवयानीच्या कोपसंतापाची
शय्यादीपा भीती
भीती शेजेच्या हासऱ्या फुलांस
मद्याने न्हालेल्या चुंबनक्षणास
भीती हट्टाची, लहरबहरीची
मंत्रमत्त दैत्यगुरुकन्यकेच्या अहंकाराची
प्रीतीची साद प्रेमखंडितेची : विद्ध अहंकार
आपुल्या जखमा झाकीत जाणारा;
देवयानीने मजवरी प्रेम केलेंच नाही
भग्न प्रीतीची समाधि बांधाया
माझ्या सुखाचे चिरे केले तिने
कचाचें प्रेम जिणतां नाही आलें
चिणिलें मला
लपवाया हा घोर पराभव
कचदेवाचा घ्याया प्रतिशोध
आली देवयानी माझ्या जीवनीं वधूवेश घेऊन
स्वामिनी बनून माझ्या सर्वस्वाची

आपुल्या जखमी अहंकाराच्या परिपूर्तिसाठी
प्रदर्शन की हें प्रेमसाफल्याचें?

तृप्तीची हिरवी ओल श्रावणाची स्मितांत तिच्या नाही चमकत
चिंब पानांतील गोड उन्हापरी
शय्यादीपांतील रत्नज्योतीपरी विजयाचें हासू
जळे तुच्छतेने थंड कठोर
लवेना, विझेना कधी फुंकरीने.
खुपती खोल स्वामित्व-अधिकार रूपगर्वितेचे
करिती विद्ध केवड्याचे काटे धुंद आपुल्या रंगगंधामधी
दहिवरकातर, प्रियेची प्रीत समर्पणातुर
मिठींत तिच्या शिवली नाही.
सहस्र दासी सेवेसाठी तिने आणिल्या सांगाती
अंतःपुरांतून वृषपर्व्यांच्या
त्यांतलाच कुणी मीहि एक दास कटाक्षांनी तिच्या बांधलेला :
जशी बांधलेली शर्मिष्ठा दासी
आपल्या पित्याच्या शरणागतीला
विकली त्याच्या स्वर्गलोकाच्या सत्तापिपासेला
शर्मिष्ठा दासी आपल्या पित्याच्या सत्तालालसेची
मीही गुलाम भोगलालसेचा
बांधितो दोघांस—काय असा—एकच हा पाश?

परंतु पाश कसें म्हणू त्याला?
अबोध भावाचे हे मर्मबंध :

फुलांमधे ओढ फुलपंखींना लोहचुंबकाची
राजीवदलांत चंद्रकराचे धागे गुंततात
ऋतुचक्राचा संमोहनस्पर्श
दिवसरात्रीच्या धरित्रीच्या गालीं
चंद्रिका पिऊन झिंगल्या सिंधूच्या
अथांग खोल जळबुंदी मनास
वाडव व्यथा मातीच्या स्पर्शाची—
असें कांहीतरी स्पर्शलें मला तिच्या डोळ्यांतुनी
पाहिलें मला जेव्हा शर्मिष्ठेने

एक क्षणाच्या सलज्ज सस्मित उघडझापेंत
हासले ओठ हासले अधर
पालवी फुटे दगडी खांबांस
आली हंसास हाक मानसाची
जन्मांतरींचें असे कांही नातें
सूर्यमालेसंगें ओवी जें धरेस
एकाच अनादी अदृश्य सूत्रांत!
म्हणतां येईल पाश कसे त्याला?
नोहे दासपण;
बंधन माझें उलट गळालें
देवयानीच्या रूपराशीचा तुटून पडला देहाचा पिंजरा
गळून पडले
शय्यागृहांतील रत्नज्योतीचे धगधगते पाश

शिवे हृदयास
दळींचें दव समर्पणातुर पारिजाताचें

भोगिलेल्या रात्री भंगूनिया गेल्या
करींच्या निसटल्या मद्यपात्रापरी
जेव्हा देवयानी निघूनिया गेली
एका मध्यरात्रीं लोटून मला, चंदनी दाराला
संतापें जळत अभिमानें वळत
कठोर शब्दीं निर्भर्त्सना करीत
पाडीत घरें माझ्या मनास
अभिमानास—

"असह्य असह्य चुंबन मला मद्यपी ओठांचें
सांगितलें मी शतवार तुम्हां
देवयानीचा शब्द कां मोडिला ?
भंगिला मान शुक्रकन्येचा ब्राह्मणतेजाचा;
दुर्गंध आरक्त दुर्मुखलें मुख
पुन्हा न घेऊन यावें शय्यागारीं
पाहिजे मदिरा किंवा देवयानी
यावें ठरवून पुन्हा शय्यास्थानीं
छायाही असह्य मला मद्यप्याची."
गेली निघून शयनागाराचें लोटून दार
ओढीत ओढीत रेशमी शेला
लोळत जातसे भूमीवरून तो

लोलच कोपाचा !
मला जाळणारा जाळ तुच्छतेचा.

उघडे दार
दाराशी जळतो गर्विष्ठ दीप
गर्वितेच्या शुभ्र कंबुकंठापरी
पैल क्षितिजाशी रात्रीचा शेव, नील तारांकित
किंचित् आर्द्र नीहारकणांनी
रेशमी वसन जसें शर्मिष्ठेच्या कातर कंपित वक्षावरलें—
सावरलें तरी पुन्हा उडणारें
बोटांमधुनी कोमल गोरट्या
कोण ही उभी कुंजाशी—शर्मिष्ठा ?

पण या उद्यानीं ?
हें काय, कानांत रथचक्राचा घुमे गडगडाट
धावत्या अश्वांच्या घामाचा कसा ओला ऊष्ण गंध
प्रतोद हातांत
मीच का रथ आणिला दौडत ?
केव्हा कसा आलों कुंजापाशी या मृगांकवनांत
मनाच्या वेगाने ?

शर्मिष्ठाच उभी जाईच्या कुंजांत
काळींहिरवीं अंधाराचीं पानें, इवलीं शुभ्र फुलें
नक्षत्रांची जाग जाग्रणाची आग थेंबली रात्रींत

उभी अंधारीं जागत शर्मिष्ठा दृष्टि खिळवून
पाहते काय अंधारापलीकडे ?
वृषपर्व्याचा—आपल्या ताताचा—विजयी देश, असुर प्रांत !
ज्याच्यासाठी तिने स्वीकारिलें दास्य जन्मभराचें
बळी देऊनि देवायनीपदीं
आपुल्या जीवनस्वातंत्र्याचा
अंतःपुरांत दासीच्या वेषांत येऊन करी
अग्निप्रवेश जीवंतपणीं ती
दैत्यदेशाच्या पित्याच्या सुखार्थ.

शर्मिष्ठा उभी रात्रीच्या एकांतीं
तें सुख, ती तृप्ती पाहते काय गूढ अंधारांत ?
तारांगणांत किंवा मोजिते चटके आपुल्या आत्मदहनाचे ?
शोधिते किंवा स्पर्शाचे झंकार
गुंजतात जे माझ्या मानसांत, अमर बनून
तेव्हापासून—
जेव्हा तिने दिला
मधूचा प्याला माझ्या हातांत भरून एकदा
स्पर्शली किंचित् अंगुली तिची माझ्या बोटांना
नाचलें थोडें डोळयांतलें स्मित मधुपात्रांत—
वळवून नेत्र अन् लगबग गेली निघून शर्मिष्ठा;
फूलपाखरें आरक्त नखांचीं सवेंच उडालीं
नाचती तींच तिच्या शेल्यावर
या महालाच्या खांबाखांबावर

त्याच क्षणांचे अमर रुंझती माझ्या मनांत
दिवसरात्रीच्या दुरंगी दलांत
ऐक शर्मिष्ठे,
अमरगीत ऐक त्या क्षणांचें
अर्थ तयाचा नाकारूं नकोस.
आपण दोघें—
सूर्य-सूर्यफूल दोन्ही अंगें झालों !
"ऐक शर्मिष्ठे,"
नकळत शब्द फुटला मुखीं माझ्या
वळे दचकून ती मृगनयना :
भरली तहान ज्यांत काठोकाठ
निघाली जाया, शरास भ्यालेल्या हरिणीपरी
"शर्मिष्ठे, थांब."
होऊन पुढे धरिला मीं हात
कोसळे ती पायीं स्फुंदत स्फुंदत

"क्षमा महाराज,
व्रत हें माझें असें मोडूं नका
दैत्यकुलाला बोल लावूं नका
शपथेला माझ्या तडा पाडूं नका
शुक्राचा कोप देवीचा मत्सर चेतवूं नका
या महालांत, सुखाच्या फुलांत आग लावूं नका
फुंकर माझ्या मना घालूं नका."
"किती साहशील किती जाळिशील

कपूरज्योत गोरट्या अंगाची ?"
"आरती आहे ती माझ्या देवाची."
"दैत्यांस कैची आरतीची रीत ?"
"देव की दैत्य मी नाही जाणत
जाळिते स्वार्थ माझ्या आरतींत
एकच अश्रु दोन्ही लोचनांत."
"त्याच अश्रूची तहान ओठांत"
"अमृताची ओल नाही त्या थेंबांत"
"गारवा हवा पाण्याचाच मला
मृगजळांत हा जीव पोळला"
"तान्हेली मृगी मी, मृगजळापाठी
फिरे आपुल्याच काजळकाठीं"
"थांब या नेत्रीं, संपेल फिरणें"
"तिथूनच झालें सुरू भटकणें
असेंच राया, फिरूं द्या झुरूं द्या
मनीचें आर्त मनींच राहूं द्या
मी पथदीप—दीपच असूं द्या
तुमच्या मार्गीं पथिका, जळूं द्या."
"त्या ज्योतीवर मलाही जळूं दे
जळण्याचें सुख मलाही कळूं दे."
"नका राजसा, असें बोलूं नका
कांहीबाही हें मला पुसूं नका
झळ ना लागो तुला माझ्या फुला.
म्हणून डोळा पाण्याने भरला"

"कोरडे शब्द ओठीं माझ्यासाठी
उरांत प्रीति फक्त पित्यासाठी
एकादा कण मला भिकाऱ्याशी?—"
"माझ्या कुबेरा, कां रे छळतोशी?
उरलें काय आता माझ्यापाशी!
सर्वस्व माझें तुला अर्पिलेलें
देतां न येई सारें शापिलेलें
स्पर्शाचे तुझ्या रोमांच लेऊन
राहून दूर आनंदें जळेन."
"मीही आगींत सुखाच्या जळालों
जवळी तुझ्या दुःख मागूं आलों."
"या जन्मीं दासी झालें तातासाठी
पुढील जन्म सारे तुझ्यासाठी
नको रे गुंतूं गुंतवूं मोहांत"
"जळूं दे देहाच्या तुझ्या चांदण्यांत."

मग हुंदक्याची चंद्रकोर ती!
गद्‌गद्‌ हालली
कोसळून पडली माझ्या बाहूंत
गहन झाली अधिकच रात मिटल्या नीलकमलापरी
त्यांत कोंडलेलें भ्रमरगुंजन
दिशांचे बंध तोडून पसरे
देहांत, देहाच्या मर्मबंधांतून
धावती दुखरी एक वेदना बनून दाहक :

उपशम जिचा
दोन देहांच्या स्पर्शाच्या पिसांत
उष्ण आवळत्या सघनगहन विजेच्या विळख्यांत
फुलांच्या, स्वेदाच्या, सगंध श्वासाच्या
ओल्या धडकीच्या, श्रांत उरींच्या गोऱ्या वर्तुळांत
गहन होतांना उत्तररात्र
मखमली क्षणांची
गंधाने जड झालेल्या तारांची
हारवती देह आपली सावली
तारे आकाश बसती हारवून !—
अशा त्या रातींत.

संपली रात
झोपेंत काजळ पुसल्यासारखी
झाकल्या डोळ्यांत
विश्रब्ध प्रीतीचा असीम विश्वास
गात्रांत तिच्या
तळीं गळालेल्या प्राजक्तपुष्पांचा उद्भ्रांत शीण
विलग ओठाशी स्मिताची कोर—
कुठे खोलखोल पोटाच्या खळग्यांत, बेंबीच्या देठाशी
चकित कळीच्या हालत्याफुलत्या सावलीसारखी—
रेंगाळणारी स्मिताची कोर;
झोपेंत धरून तिने ठेविलेला

अन् माझा हात
सुटूं पाहणारा प्रीतीचा क्षण!

राहिला हात तसाच हातीं
सुटला क्षण पद्मकोषांतल्या भ्रमरासारखा
अर्थासारखा
यमकामधून दोन शब्दांच्या—दोन देहांच्या.
देहाचा अर्थ बुजला मानसीं
रात्रीचा अर्थ भ्याला उजेडाशी
वत्सा, पुरू, रागावूं नकोस
सोडून कुंजांत निद्रिस्त शर्मिष्ठा
आलों मंदिरांत देवयानीच्या
प्रतारणेचें हासू पांघरून
विझला होता दीप शय्यामंदिराचा
माझ्याही मनाचा
किरली होती सोन्याची समई
येईल रात, उजळेल वात
परी इथे माझ्या प्राणाची ज्योत
पेटणार नाही—
पडूं दे देहाचा उजेड नग्न
उजळूं दे चंद्रांनी कटाक्षशलाका देवयानीची.

तिला आली जाग फुलत्या फुलांची
फुलांतील हाक अदृश्य फळाची

हाकेचा त्या अर्थ उराशी जपत
चाले ती दिवसा
दुरूनदुरून सूर्यमंडलांत
फिरते पृथ्वी अशीच निःशब्द
समुद्र दुःखाचे धरून पोटीं
नव्हता ओठीं शब्द निषेधाचा
आठी भिवईत अधिक्षेपाची
वंचित विरही रात्रीच्या धाग्याची
धावत्या नदीची समर्पणधारा
अवघ्या नेत्रीं, अवघ्या गात्रीं

बाळा पुरू,
सोडून तुला दूर आश्रमांत बाळपणींच—कसें सांगूं?
पुत्रप्रेमाचाही बळी दिला तिने
या ययातीच्या क्षुद्र प्रेमासाठी
भीरू भूपाच्या यशाच्या पोगर कीर्तिमुखासाठी
दुष्ट ययातीच्या किरीटामधल्या
झगमगणाऱ्या गारांचें तेज निर्मळ राखाया
आपल्या चंदिर भालबिंबावरी, कलंकाचा भार
साहिला सारा तिने एकटीने
मातेचें मनही नाकारिलें तिने
अमृतधारा निजवात्सल्याची
आटविली तिने उरींच्या उरींच
फांदीवरल्या वाळत्या फळाचें तप आचरून.

दैत्यजयासाठी
घेऊन दारुण दास्याचा वसा
या महालांत आली शर्मिष्ठा
आणि आज इथे जाळिते प्राण
वंचक भीरु एका प्रीतीसाठी :
अदृश्यपणे असेच जळती कुसुमगंध
हासऱ्या दळांत होऊन धूप
दिवसा उन्हांत विरतें जेव्हा दहिवर रात्रीचें,
माझे गहिवर असेच जिरले
शपथांचें दव शब्दांत वाळलें
पेटूं लागली कुपित मत्सरी
धगधगती दृष्टि देवयानीची
शय्यादीपांत, रात्रीं शर्मिष्ठेच्या मालवलेल्या
क्रंदन तुझें कधी ऐकूं येई
मर्मरघोषांत एकांत रात्रीच्या
स्मरे कधी तो तुझा बाळहट्ट
मुकुटासाठी यदुमस्तकींच्या
देवयानीचे धगधगते शब्द :
"धारिष्ट्य पहा या दासीपुत्राचें."
शर्मिष्ठेची मुद्रा
अपमानाच्या ज्वाळांत जळणारी
क्रोधाने पेटत, दुःखाने फुटत
तुला आवेगाने ओढीत नेणारी
तिची हालचाल

वणव्याची रेषा वळत जाणारी
स्तब्ध रात्रीच्या निळ्या डोंगरांत—
स्मरतें हें सारें
टाकितां पाऊल शर्मिष्ठेच्या दारीं
उठते जेव्हा दचकून रात्र
आभाळीं चंद्र ओला होतांना घर्मबिंदूंनी
तेव्हा वाटे भय :
भय माझिया चोरट्या मनाचें
भय शर्मिष्ठेच्या निश्चल प्रीतीचें
तिच्या अतर्क्य अथांग मौनाचें
अनामिक भय—
काठ नसलेल्या अंधाररात्रीचें
काळें ओलें भय अतळ जलाचें !

भ्यालों मी प्रीतीचा कराया स्वीकार
भ्यालों मी प्रीतीचा कराया उच्चार
हृदयाचा होकार
गोठवतांना चुंबनठशांत
दाटरणाऱ्या बोटांच्या स्पर्शांत
दहिवरत्या तमाच्या क्षणांत
परका झालों आपण आपणा :
नाकारलेला प्रीतीचा स्पर्श !
आपल्या डोळां लाजूं लागलों मी
शर्मिष्ठेच्या डोळां बुजूं लागलों मी

तिच्यापासोनी लपूं लागलों मी
निज पायतळीं छाया होऊनी मध्यान्हीची दग्ध.

दग्ध छाया? होय, दग्धच असे
शुक्राच्या शापांत
अन् यौवनाच्या पल्लवारुण तुझ्या उःशापांत
वंचित संतप्त देवयानीने
पाचारिलेला पुढे शुक्रदेव
पेटला मंगळ क्रोधाच्या ज्वाळांनी
शेजारी शर्मिष्ठा कापे चळचळा
स्तब्ध देवयानी बाजूला विझून
सोन्याची समई भग्न राउळींची
वादळ फुटे निःशब्द पानांत : गर्जे शापवाणी
"जराग्रस्त हो स्त्रीलंपटा तूं
विश्वासघातक्या."
पिवळें पान, पिकली कातडी
थंड बर्फापरी केस पांडुरले
दृष्टींत धुकें जमलें वयाचें
भोगभाराने वाकलें शरीर, कापे थरथरा
ठणके अभिलाषा सांध्यासांध्यातून
रक्ताचे तीरीं अतृप्त इच्छांचे नाचती टेंबे
किरकिरे वासना नसानसांतून होऊन रात्र
भयाण काळी.

अंधारांतुनी त्या
हिरव्या डोळ्यांचे नाग वळावळा येती, आवळती
कंठाभोवती, हृदयाभोवती
काचत जाती पाठींत, कण्यांत
थंड आगीच्या ज्वाळांचे दोर
कोसळलों मी गुडघ्यांत मोडून
पिकल्या पानांची मस्तकांतून उठे वाहटूळ
गर्गरा त्यांत फिरत उडालां
यदु, पुरू तूंही—
उडून चालली शर्मिष्ठा कोमल
देवयानी ती सुवर्णतप्त रूपगर्वासह,
उडती त्यांत
लक्षलक्ष किती झुरेबावरे वदनचंद्र अन्
कुठे लक्षमाळा राजीव नेत्रांच्या
सुवर्णकुंभ कुचयुगुलांचे त्यांत भ्रमतात
इंद्रधनुष्यें सहस्र शेल्यांचीं, उडती वाऱ्यांत
सहस्र तनूंचे घेऊन गंध;
त्या वातचक्रांत माझाही देह
भिरभिरूं लागे
पेटत शुभ्र केसांच्या टोकांनी !

"वाचवा, धावा, पेटलों जळालों."
लागलों पायीं उःशाप मागाया.
पुरुराजा, वत्सा,

देऊन बळी तुझ्या तारुण्याचा
जिंकिली जरा मीं, टाळिलें मरण
केवढी भीति जरा-मरणाची !
सुटली नाही उशना कवीलाही.
फळाचे मनीं
पिकलेपणाचें असतें का भय ?
थरथरलें तें परी एक क्षण
तपस्वी शुक्राच्या वज्राच्या मनांत,
हाळी दिली जेव्हा
कचाने बसून सुरेच्या थेंबांत
राखेच्या कणांत
मालवणाऱ्या मद्याच्या कैफांत;
संजीवनीचा द्रष्टा दचकला
मृत्यूच्या केवळ विरळ तरळ क्षण कल्पनेने
निज मरणास भिऊन त्याने
दिली संजीवनी

पोटीं लपल्या शत्रूच्या पुत्रास
(उषःकालीं शांत
जागतां मनांत संजीवनीमंत्र
देवांचा प्रिय
देवयानीचा प्रियकर कच
आला असता ना जिवंत होऊन
उदर फाडून शुक्राचें बाहेर ?

अन् कदाचित् नसतें दिलें
पुन्हा संजीवन शुक्रास त्याने.
संजीवनी मंत्राच्या उद्‌गात्या ऋषीचें
अपेशी मरण !—
घोर विटंबना, दारुण मृत्यु—ह्यालाच भ्याला तो.)
शापितो मला तोच शुक्राचार्य
स्वता भ्यालेला
भीरूच मीहि !
शापिते अशी भीतीच भीतीला.

भोग सारे माझे भीतीने भोगिले
भीतीनेच मीं साऱ्यांस सोडिलें
आपलेपणाही सलतो एखाद्या भयाण क्षणीं
काट्यासारखा.
शर्मिष्ठेच्या ओल्या अश्रूंनी भिजल्या
नेत्रदळांचे कोमल केसर
असेच खुपले
माझ्या हृदयाला;
पुरून घेतलें आपणास मी
रूपवतींच्या रूपकोषांत
सहस्रसहस्र रूपदर्पणांत भग्न वासनांच्या
बिंबून अडकून
जगतों जीवन शतखंडित हें
प्रतिबिंबाचें बद्ध परकें

स्वताचें असून
नित्य नवीन स्त्रीदेहाच्या अनोळखी आयन्यांत
पाहत स्वताला भंगलेपणांत
विसरूं बघतों ओळख स्वताची
विसरूं पाहतों स्वताला ना फक्त
विसरूं पाहतों
शर्मिष्ठेची प्रीति
देवयानीची सत्ता नि संताप
उग्र अहंकार शुक्राचार्यांचा
कोपशापांतील त्याचा भीतिगंड
आणि वत्सा, तुझी—क्षमा करी मला—
ती पितृभक्ति, तो दिव्य त्याग
डोळ्यांतली तुझ्या निर्भयता ती
सारें सारें मला
विसरायचें आहे—माझ्या भीतीसह.
चिणूं पाहतों मी
मत्त प्रमदांच्या आरस्पानी त्या चिरेबंद देहांत
फुलांच्या वक्षांत
खोल स्वप्नडोंग्या काजळकाठांत
जीवनांतील विफलतेचें भयानक सत्य,
घोर रितेपण
कातडीचा ठाव
डोळ्यांचें पाणी

किती खोल सारें ?
या माधवीच्या निद्रेइतकें ?

अजून कशी झोपलीच आहे
कमळाचें निष्पाप मिटलेपण घेऊन !
उसवलीं आहेत
माझीं कांही वर्षें : जखमेसारखीं.

असेच होते झाकलेले डोळे
माधवीचे ? नाही. आईचे तिच्या—पद्मिनीचे त्या—
झोपली होती ती, प्राशून विष
माझ्या शय्यागारीं पुष्पशेजेवर
पाहण्याआधी फुलांचें मरण
चुरगळण्याआधी
डोळ्यांतलें स्वप्न अनवांछित चुंबनदंशांत
मोडण्याआधी
प्रीतीचा भास देहाच्या घडींत !
रात्रीच्या पहिल्या जाईच्या प्रहरांत
विनवीत होती ती
डोळ्यांत अश्रु आणून एकांतीं
मोडत मिठींत—
“नका हो माझा धर्म मोडूं नका
संसाराची घडी विस्कटूं नका.”
ऐकून ते शब्द हासलों खदखदा

नग्न कट्यारीच्या मुठीवरील
आरक्त पिवळ्या रत्नासारखा—थंड कठोर
(दुसऱ्याने आज इथे आली होती
असेंच तेव्हा बोलली होती ती
पहिल्या वेळीही.)

दुसऱ्या चंदेरी विवस्त्र प्रहरांत
पडली होती ती बेभान बेशुद्ध
गोल उरोजांत कोंडलें होतें
उद्ध्वस्त पक्षींचें भृंगांचें क्रंदन
गोंदीत होता अन् चंद्र चांदण्या
उघड्या अनाथ तिच्या मांड्यांवर—

चौथा प्रहर विरळ रात्रीचा :
चंदनगंध कुचतटींचा वाहून नेणाऱ्या
शीतळ जळाचा,
वाळूवरती तिचा मृत देह
लाटांच्या रेशमी शेल्यांत झाकला
विर्घळलें होतें पापण्यांशी मीठ
फुलांच्या शेजेवर जमलेलें,
नखक्षतांचा
नव्हता आता दाह
नव्हती सुरुंती मोडल्या घडीची

कुठे देहावर,
विमुक्त आता विसावली होती
चाफ्याची मूस
निज नग्नतेंत,
नाकारून दृष्टि
स्वप्न नाकारून
मिटल्या होत्या हट्टी पापण्या त्या
आनंदनिद्रेंत आत्मघाताच्या—
आनंदनिद्रा ?—हो—स्मरतां आज ती
जीवन वाटे
काळाच्या गतींत एक अकस्मात
उठलेली कळ तीव्र वेदनेची
आशयहीन
मरण तें मग आनंदनिद्रा होय सहजचि—

पण तशी नव्हे
आनंदनिद्रा मुग्ध माधवीची
तिच्या मिटल्या नेत्रदळांमधी
कुंकुमरेखा उद्याची आरुणी
उमलूं पाहते
नव्या विश्वासाच्या सहस्रदलांनी
मीं दिलेल्या वचनांमधून.
झोपण्यापूर्वी किती रडली ती
"कोण तूं ? पद्मिनी ?"

"नाही. माधवी. मुलगी मी तिची."
उधळून गेली
माझ्या मनांतली रात्रीची कस्तुरी
हुंदके तिचे, जाईचीं फुलें शुभ्र सुकुमार
अडविणारीं
कुस्करणारे हात, हिमें घडिलेले
विलक्षण तिचें रडणें असे
स्वतःसाठी ?
नव्हे, माझ्यासाठी.
"बाबा, वाचवा, वाचवा स्वताला
अधःपातांतून, मला वाचवून
नका हो करूं कन्येशी व्यभिचार—
माझ्या आईच्या मृतदेहावर
जळता डाग पुन्हा देऊ नका.
कलंक तिचा पुसला एकदा
नदीच्या लाटांनी—
त्या पद्मिनीची—तिचीच कन्या मी."
"तिची कन्या तूं? कोण ? माधवी ?"
शब्द तिचे ते :
खिळा लोखंडाचा छातींत शिरला
चिरली रात्र नक्षत्रमंडित भर्जरी वस्त्राची
सोलली त्वचा सौंदर्यभोगाची !

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
अ. क्र. ........
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

“ दया करी रे
सोड सोड राजा, जाऊं दे मला
नकोत तुझे ऐश्वर्यविलास
रत्नांची रास
त्यांस येतो वास
माझ्या आईच्या बुडाल्या देहाचा—
गेला तिचा आत्मा
उरलें केवळ प्रेत तिचें मी
वांछिशी कां सुख प्रेतसंभोगाचें ? ”

ऐकतांना हे माधवीचे बोल
गळाले पंख फूलपाखरांचे
उडाले नभांत धूर होऊन फुलांचे रंग
उरली हातांत वेळूची काठी
मावळून सूर—
सुरांचा तरी अर्थ काय पण ?
वीतभराचा तुकडा वेळूचा
भोकें त्यास कांही
कांही तार-मंद्र स्वरांच्या त्या जागा
वादी-संवादीचा म्हणे कांही मेळ
भावांचा कल्लोळ
कशाचा अर्थ ? माधुर्य कशाचें ?
कशाची संगती ?
असाच नाही का

स्त्रीपुरुषांच्या नात्यांचा मेळ ?
मुलगी, माता, बहीण हीं नातीं
आधी कुठे होतीं ?
कुणास माहीत
उद्या कदाचित् विरून जातील
स्त्रीपुरुष हा एवढाच भेद उरेल शेवटी
प्रलयानंतर उद्ध्वस्त गुहेंत
निबिड वनीं.
गोऱ्या भुजांच्या वक्र रेषेपरी
अबोल तीरीं वाहत्या नदीच्या
यमीने भोग मागितला भावास
लागला पाठीस सरस्वतीच्या
वेडा ब्रह्मदेव पेटून मांड्यांत;
मस्तक एक समाजविन्मुख तुटून पडलें
चतुर्मुख झाला
सृष्टीचा निर्माता,
सत्ता हारवून बसला आपुली
आपण रचिल्या सृष्टीवरली
आपल्या सुंदर निर्मितीवरली !
जाहला विष्णू विश्वाचा नियंता
तोही झोपला शेषशय्येवर;
मस्तकीं त्याच्या नाचती जागती
सहस्र प्रश्न दाहक विषारी शेषफणांचे

फणांवरी त्या फिरते धरणी
त्या धरणीच्या क्षुद्र कणावर
मर्त्य माणूस, कीटक तो क्षुद्र
रचितो शेणांत स्वप्नें स्वर्गांचीं अमरत्वाचीं
काय त्याचा केवा ? कुणास काळजी ?
तरीहि बिचारी
पापभाराने गांजली पृथ्वी
प्रार्थिते प्रभूला गाय होऊन
परित्राणासाठी धर्माच्या, साधूंच्या
परी प्रभूची योगनिद्रा कांही
भंगत नाही—
साधु कोण परी ?
अन् पापी कोण ?

किती वेडे सारे विचार माझे
एखाद्या वेड्या कवीसारखे !
कवि नाही मी
आणि जीवनही काव्य नव्हे तें !
जीवन म्हणजे ?—म्हणजे—अंधार ?
अंधार सूर्याने पाहिलेला—तसेंही नव्हे—पण
नकोच विचार—
परंतु विचार फुटती काय
झाडांना का कधी
हजार वर्षें जरी तीं भिजलीं

पाऊसधारांत ?
(अश्रूंनी भिजल्या मानवाप्रमाणे)
विचारांना तरी अर्थ काय अंतीं ?
अर्थ काय साऱ्या मानवी जीवना ?
सुखदुःखांना ?
भोगविलासांना ?
सुवर्णकमल उत्फुल्ल सुंदर
सहस्रदळें वेचून लुंचून
गावतो न गंध कधी अंजुळींत;
उरते पोकळी निरर्थ अदृश्य
—जाणवते फक्त
आपल्या अनादि रितेपणाची :
एक धुगधुगी मृत्यूंत विरणारी
सर्वच असें संपणार आहे निरर्थपणांत
सनातन अंधारीं.

पहा हा प्रकाश मावळत्या चंद्राचा
गवाक्षांतून माझ्या दिसणारा
तें चंद्रबिंब
विघळत आहे काजळक्षितिजीं
कलंक, मृगांक—म्हणा कांहीही
शुभारंभ त्याच्या विरघळण्याचा !
—ह्या सूर्याचीही

होईल अशीच एके दिनीं राख !
प्रचंड थर, राखेचा डोंगर
धगधगणारा, नभा भिडणारा;
परी त्याच क्षणीं असेंही वाटतें
ह्याच राखेंतुनी वेचितां येतील
नित्य नवे सूर्य !—
जेव्हा पाहतों ना मी तुझ्या डोळ्यांत—
अक्षय तारुण्य मला देणाऱ्या
शापास वराचें रूप अर्पिणाऱ्या
त्या तुझ्या डोळ्यांत;
निद्रिस्त निष्पाप मृगनयनांत :
कुणाच्याही दुःखें
मेघवृष्टीने भरून येणाऱ्या
या माधवीच्या नभनील नेत्रांत;
कधी शर्मिष्ठेच्या आर्त लोचनांत
आरक्त देठाच्या पारिजाताच्या पलकदलांत :
कोमल बावऱ्या
विश्वासाएवढ्या अथांग जळांत
त्वचेच्या पैल तेवणाऱ्या त्या देहाच्या दिव्यांत
निरांजनाच्या शांत ज्योतींत
पाहतों मी जेव्हा
वाटतें असें—
आजच पहा
जाईजुईच्या फुलांच्या जाळींत शेजेवरच्या

लपवून मुख स्फुंदणाऱ्या या मुग्ध माधवीला
विचारिलें मीं,
"काय करशील
मुक्त केलें तर
ढका न लावतां तुझ्या कौमार्याला
अलंकारुनी वस्त्रांभूषणांनी
घरीं तुझ्या तुला पाठविलें तर
असें अनाघ्रात,
काय करशील ?"

"परत आता घरीं न जाईन
घर मोठें झालें कोसळून भिंती
वस्त्रेंभूषणें शृंगार कशाला ?
माझी लाज आता झाकील माझा शेव करुणेचा
आपंगितांचा,
तीर्थयात्रा मी करीत हिंडेन
मागीन आयुष्य मुक्तीच्या दातारा
या माझ्या पित्याला,
पडतां पडतां एकदा तरी—सावरलेल्या
दुःखी पतिताचें
कल्याण मागीन."

"सावरलेला ? कशाचा ? कुठे ?
सावरिलें तूं, पडलों जेव्हा हृदयव्यथेने

गडबडा लोळत बेशुद्ध बेभान,
तूंच सावरिलें नराधमाला या
तुझें शील जाळूं निघालेल्या या दुष्ट दानवाला
केलेस तूंच शीतल उपचार—
अत्याचारी दुष्ट पाप्यासाठी तूं
आसवें भरून आणिलींस डोळां."

"आसवें आलीं तुमच्याही नेत्रीं,
कुठे काळजांत खुपल्याशिवाय, दुखल्याशिवाय
व्यथेवाचुनी फुटती न अश्रु,
त्या वेदनेंत जीवनाचें नवें
फुटतें पातें हिरवहिरवें :
लेऊन जिभाळी रोज अमृताची."

डोळ्यांत तिच्या
हास्याचें ओलें असें ऊन सांडे;
पाहिलें होतें जें तुझ्या डोळ्यांत
सहस्र वर्षांपूर्वी एकदा मी
आज या रात्रीं पाहिलें फिरून
आणि वाटलें—
राखेंतून सूर्य वेचिता येतील!

शृंगारून माधवीस आधी
शिबिकेमधून घरीं बोळवीन—

खरेंच नाही
साजेशी तिला सुवर्णशिबिका ही,
पालखी हवी
सुंदर कशी तिला या दिव्य अरुणोदयापरी !
—जाऊं दे
नंतर—
जेव्हा तूं येशील
येथे माझा देह दिसेल तुला शांत पडलेला
सुवर्णदंड
विसरून साऱ्या यातना-तृषा
अन् मी स्वता
क्षितिजाच्या पैल
गेलों असेन वेचण्यास सूर्य
राखेमधून !
—असलाच तर ! !
असो. आशीर्वाद अनेकोत्तम
अनृणी तुझा
पिता.

ययाती



অগ্নিপত্র

भागवताच्या चौथ्या स्कंधातील चौदाव्या अध्यायात वेनराजाची एक लहानशी कथा आहे. त्या कथेवर प्रस्तुत काव्य आधारले आहे. वेन हा एक आत्मपूजक व प्रजापीडक दुष्ट राजा होता. यज्ञ बंद करून, विष्णूऐवजी स्वतःचीच पूजा करण्याची त्याने ब्राह्मणांस आज्ञा केली आणि प्रजेचा छळ आरंभिला. ऋषि-ब्राह्मणांनी त्याला या मार्गापासून परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण त्या राजाने कुणाचाही उपदेश ऐकिला नाही. म्हणून क्रुद्ध झालेल्या त्या तपस्व्यांनी त्या अधर्मी राजाचा हुंकाराने वध केला, अशी मुळात कथा आहे.

यज्ञ ही एक आर्यांची सामाजिक संस्था होती आणि फार प्राचीन काळी भारतवर्षातल्या काही भागांत लोकनियुक्त राज्यपद्धती अस्तित्वात होती, या दोन गोष्टींचा समन्वयाने विचार केल्यास, कथेतल्या या घटनेमागे कोणते विचार, कोणते विकार व कसल्या भावना आंदोलत होत्या, याची कल्पना येण्यासारखी आहे. या धार्मिक असंतोषाच्या घटनेमागे एक लोकक्रांती जागृत झाली होती; व्यक्तिस्वातंत्र्याचा नि मानवतेचा विध्वंस करून, एकतंत्री सत्ता चालविणाऱ्या सर्वाधिकाऱ्याला, अतिमानव होण्याच्या भयंकर महत्त्वाकांक्षेच्या धुंदीत जनतेच्या इच्छांना तुडविणाऱ्या झोटिंगशाहाला झालेला मानवतेचा तो पहिला प्रतिकार होता; ते एक युगांतर होते.

रूपकाचा आश्रय करून हुंकारातून ध्वनीत केलेली ही क्रांती ज्ञात असलेल्या मानवी इतिहासातली पहिलीच जनक्रांती ठरेल. इतिहासातला हा पहिला मानवी प्रतिकार हिमालयाच्या कुशीतच प्रारंभी जागृत झाला;—या काव्यदृष्टीने मी या खंडकाव्यातल्या कथावस्तूकडे पाहिले आहे.

हे झाले काव्यवस्तूविषयी. आता रचनातंत्रासंबंधी थोडेसे सांगतो. या काव्यात कथन व नाट्य या दोन्ही रचनापद्धतींचा उपयोग व संयोग करून कथावस्तूचा विकास व परिपोष करण्याचा प्रयत्न मी केला आहे. पूर्वार्धात लोकस्थिती व प्रजेने राजावर केलेल्या अभियोगाचे वर्णन कथनपद्धतीने केले आहे; तर उत्तरार्धात, राजाच्या अत्याचारामुळे निरनिराळ्या व्यक्तींच्या व्यक्तित्वाचा कसा कोंडमारा झाला, त्यांच्या भावनांच्या वादळात क्रांतीचे वारे कसे वाहत होते, आणि असंतोषाच्या हुंकारामागे मानवतेचे व स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची तळमळ कशी उफाळत होती, हे कांही प्रातिनिधिक पात्रांच्या द्वारे वदविले आहे. येथे नाट्यपद्धतीचा उपयोग केला आहे. आत्मनिवेदनाच्या पद्धतीत जगातल्या अतिगहन व कोमल सत्याला न कळत वाचा फोडण्याचे सामर्थ्य असते. या दोन पद्धतींचा संयोग काव्यवस्तूच्या विकासास किती उपकारक झाला आहे, ते रसिकांनी ठरवावे.

## व्यासवंदन

भगवान व्यास,  ज ही प्रणती
अर्णव तूं अम्हि तुझे लाडके चलतरंग तीरावरती

प्रतिमा तव, रविमाला उजळे
मंथर भावचि, सागर उसळे
तव पदपंक्ती, जीवन सगळें !
अजर अमर तूं मानवतेचा स्वतंत्रतेचा कवि जगतीं
भगवान व्यास, तुज ही प्रणती

हिमालय, तुझें धवलोन्नत शिर
हृदय तुझें भारत हें सुंदर
मंत्रघोष तव, गंगामर्मर
दिक्कालांवरि बाहु उभारुनि, वरदान द्या मुने, अम्हांप्रति
भगवान व्यास, तुज ही प्रणती

## पूर्वपथ

हिमगिरिची धवलोन्नत शिखरमालिका
पूर्व हिंद-यशोहास्य राशिभूत का?
मानवतेचें की जड व्यथित हृदय हें
स्वर्गकपाटें फोडुनि क्रंदतसे हें!
युगनिद्रेमधि भारतराष्ट्र झोपलें
वज्र तयाच्या उशास हें पडलेलें!
छेदाया पारतंत्र्यपाश, कधीची
वाट बघे निद्रित नव इंद्रकरांची!!

कल्पने, कशास उगी पंखभरारी
सांग कथा, जी जागे या हिमकुहरीं

ती प्रभात हिमधूसर, नुजळली प्रभा
शांत हिमालय, असाच टेकुनी नभा
स्कंधीं शिरिं ढगमाळा विरळ पसरल्या
मिळति त्यांत रात्रीच्या खिन्न सावल्या
या छायांतून अरुणराग उसळती
पदर धुक्याचे वरुनी धवल पसरती
पिंजुनि कापूस पडे बर्फ मधोनी
जाई कलहंस एकटाचि उडोनी
फडफडाट तो त्याचा पवनिं नादतो
अर्धसुप्त गगनाचा श्वास वाटतो!

नक्षत्रें लपति, जाय रात्र संपुनी
अजुनि पूर्ण तम न सरे परि दिशांतुनी
रात नीळ हिमराशीवरति वरसते
एक शेष चंद्रकला क्षितिजिं झळकते
छायांतुनि फुटत नभीं अरुणरक्तिमा
खाली हिमगिरि अफाट, स्फटिकनिभ कमा
अचल हिमाचल भासे ध्यानमग्न की
तुहिनधवल दीर्घ जटाभार मस्तकीं
प्रलयंकर शिव का तप करित बैसला
अरुणोदय तो त्रिनेत्र ध्यानिं झाकला!

ध्याननिमीलित का हो तो त्रिलोचन?
की उघडुनि अपलक करि अग्निनर्तन?
शिखरें तीं उतरुनि या, पहा खालती,
या भूवरि तरुण अरुणकिरण संगतीं
दशदिशांत पसरतात आरुणी छटा
त्या प्रकाशिं पेटतात कृष्णघनघटा
पथिं, हिमांतही ज्वाला आर्द्र जागती
जीवनधन हिमराशींमधिहि निर्मिती
घन धुक्यांत, जें कुहरीं झाकलें दिसे
नगर हिमाचलकुशींत 'श्रीपुरी' वसे

चोहिकडुनि तुंग तुंग ही गिरिमाला
हरित असित तीमध्ये घन वनमाला

ये जलप्रपात हसत पर्वतांतुनी
धरणीचा पहिला प्रतिकार जीवनीं !
शैलखंड गिरिकपाट चिरुन चालला
नच विकास बंधनांस भिउनि थांबला
गात झरा येउनिया या वनस्थळीं
जीवनकासार निर्मि पर्वतातळीं
त्या जळांत तें धूसर नगर बिंबलें
शोधिते भविष्य राजधानि आपुलें

अरुणरागरंजित जळिं नगरगोपुरें
तळपति, किति उंच उंच राजमंदिरें
उज्ज्वल प्रकाश किती—लाट आरुणी !
हें न तेज, उठति जाळ गोपुरांतुनी
तरुगृहांवरुनि कसा धूम दाटला
पसरे युग-असंतोष काय साचला !
मंगल प्रभातदुंदुभी न वाजती,
मंद्र सामगायनसुस्वर न गुंजती,
श्रवणिं एक कोलाहल ये भयंकर
क्षुब्ध लहरिवरि डळमळ दिसत ‘श्रीपुर’ !

मुक्त पहा श्रीपुरिचें महाद्वार हें
काळाचें चकित थकित मुखविदार हें !
प्रहरि धनुर्धर दारीं, शर गुणासनीं
लखलखती भालेही ते पथांतुनी

स्नेहहीन विश्वचक्र किरकिरे कुठे !
कोलाहल राजबिर्दीतुनि असा उठे
राजपथीं दिसती जन क्षुब्ध धावते
दोरीहुनि सुटलेले शर ताडित ते
धनुषकोटिंनी सैनिक त्यांस अडविती
क्षण थांबुनि फिरुनी संमर्द लोटती

पौर रमणि सौधावरि गवाक्षीं किती
मृगनयना सभयोत्सुक उभ्या, पाहती
नीरांजन, आरती न, तेवते करीं
पुष्पें नच तबकीं, नच मोद अंतरीं
राजमंदिराकडेच लोक चालले
मधुनि कुठे मार्गावरि ऊन पसरलें
स्कंधीं धनु पाठीवरि कसुनि तुणीरें
क्षात्र वीर, राजपुरुष निघति समोरें
खिणखिणती हय त्यांचे धूळ उडवुनी
किंकाटति गज शुंडादंड उभवुनी
रुद्राक्षें कंठिं, अंगिं भस्म चर्चुनी,
पांघरूनि व्याघ्रांबर, मृगाजिन कुणी
ऋषि, मुनी, तपस्वि, मनस्वीहि चालती;
उडति जटा, नेत्रीं अभिशाप पेटती !
ललना त्या संमर्दीं कितिक मिसळल्या
किरणापरि जलक्षोभिं त्या चकाकल्या !

ग्राम्य, दीन, पीडित किति जीव त्यांतले
अस्थिशेष, तनुवरचें वस्त्र फाटलें
पांघरवुनि पृथ्वीशीं वसन भर्जरी
राखाया लाज ज्यां न चिंधिही पुरी
पुरुषभरी अन्नरास नित्य घालुनी
क्षुधित राहिले दिनांतिं सतत जीवनीं
निवारा न वैजयंत रचुनि ज्यां मिळे
पांघरून धूळ, शिलाखंडिं झोपले;
अर्धभुक्त, अर्धसुप्त, अर्धझाकले
स्फुल्लिंगचि येती ग्रामीण त्रासले!
नेत्रीं आरक्त दिसे भूक युगाची!
पिचल्या हाडांत दिसे शक्ति नगाची!
लटपटती क्षीण पाय ते पथावर
पायचलीं याच येई तें युगांतर!!

कोलाहल, धूळ उडे त्या पथांतुनी
धूमलोळ येति राजमंदिरांतुनी

"पुत्राच्या अत्याचारांस त्रासुनी
अंगराज निर्वासनिं जाय ज्या दिनीं
त्या दिनींच आजचें भविष्य अबरीं
रक्ताक्षरिं तप्त लिही सूर्य निजकरीं!"
मुनि म्हणती, एक वलित जटा सारुनी,
राजपुरुष, नाचवीत शर, वदे कुणी—

"क्रूर नृप असाच, बाळपणापासुनी
नर्मकलहिं, प्रिय मित्रा वधित हासुनि
विद्ध शरीं कोणाच्या प्रभ्रमृग, पडे
युवराजक्रोधा अन् मित्र बळि पडे."

"चौदा भुवनांत अम्ही 'अंग' शोधिला"
वृद्ध राजकारणि तों एक बोलला :
"शोध न त्या नृपतीचा परि कुठे मिळे
अगतिक निःश्वास! मंत्रि परत लोटले
व्यक्तिला विचार, दृष्टि-तेज लोचनां
नेता राष्ट्रास तसा प्रगतिजीवना,
म्हणुनि विप्र मंत्री मग अराजकभयें
राज्यावर या वेना स्थापिती स्वयें
हेंच शस्त्र परि टाकुनि मूठ उलटलें!
पथदर्शक दिवटीने पथिक जाळिले!"

"अधिकार न हा, दहना पवन लाभला"
अग्निहोत्रि सुहाग्निच वृद्ध बोलला,
"'मी नरेश, अग्रमान सर्व मज असे
दास तुम्ही तनुमनिं मम,' भूप वदतसे
'अर्पा मज हविर्भाग यज्ञपुरुष मी!
प्रजापाल, धरापाल, विश्वपाल मी!'
आश्रम जाळून, हवनकुंड तुडवुनी
विध्वंसी यज्ञ, वेन मग तपोवनीं

अपमानित यज्ञानल तो भयंकर
होइ क्रव्याद! जळे नृपतिमंदिर"

"उपेक्षिली ही माझी आग भुकेची
धग माझ्या लत्ताहत श्रमिक करांची!"
त्या विप्रा, श्रमिक वदे कर उभारुनी
तप्त धरणिधूलि उडे श्रमिकलोचनीं!
"यथाशक्ति कर घ्यावा प्रजेपासुनी
वर्ते ही राजनीति भूप सोडुनी
धन देउनि, ही उपाशि तनुहि देउनी,
करभार न पूर्ण होय अजुनि जीवनीं
मानवस्वातंत्र्य दान मागतो बळी
सत्ते, नच पचतो परि कधिहि नरबळी!"

"सृजनशक्ति श्रेष्ठ ती स्वतंत्रतेहुनी
स्त्री हें तिचें प्रतीक थोर महिहुनी
क्रोध तिचा हा जागे राजगोपुरीं!"
ऋषिकन्या गर्जे मग चव्हाट्यावरी
"भोगमदीं दारूची चूल समजुनी
स्त्रीशक्तिस दासी करि भूप वंचुनी,
प्रत्यंचा ताण सहुनि ती तुटे अता
बंड करी दासांची ती सहिष्णुता!
परित्यक्त राजलक्ष्मि ती पहा पुढे!
सांगूं ये, 'राजा भरलेच तव घडे'"

तापस आरक्तवदन करुण सुंदरी
त्यक्ता ती रमणि उभी चौपथावरी
उडति मुक्त केश मुखीं, निटिलसिंदुरीं
धूम्रलोळ ज्योतीच्या जणु शिखेवरी !
आकांक्षा जनतेची दलित ती दिसे,
का फेनिल प्रलयलहरिभंगिमा असे !
राजमंत्रि जवळ उभे, शांत बाहिरी
मंत्र राजनीतीचे गुप्त ज्यापरी
निष्कोषित खड्ग जसें किरणिं लवतसे
सेनापति तो अधीर पुढति फिरतसे;
राजकवी स्तब्ध उभा, गीत जागतें
नवयुगिचें उदयगान की निनादतें !
अंगारचि भस्मराशिंतील उजळते
भार ऋषींचेहि उभे राहिले तिथे;
त्यामागे लोक असंख्यात पसरले
पुलक पुलक, पृथ्वीचें काय जागले !
दशशतजनचलनिं असें नगर लहरतें !
दशशतकलकंठिं असें नगर गर्जतें !

सिंहद्वारासमोर राजसभेच्या
भव्य त्या पटांगणांत नगरवीथिच्या
स्तंभाशीं बद्ध वेन चरणिं शृंखला,
राजदेह रक्तचंदनें विलेपिला

मराठी ग्रंथ संग्रहालय
२५५६
दा. क्र. काव्य २५३३२

रक्तपुष्पमाळाही कंठिं लोंबती
रक्तछटा घूर्णित नयनांत चमकती
आव्हानें स्वीकारुनि जनक्रांतिचीं,
शांत उभा वेनराज नग्न खड्गची
अनुताप न, दीनता न, भीति लोचनीं
पंखहत गिरीच उभा खवळल्या जनीं

राजगृह दृष्टिपुढे जळत धडधडा
स्वर्णकळस कोसळती पुढति कडकडा
जाळलोळ लाललाल वेंघती नभा
चाटुं येति जणु कराल नियतिच्या जिभा;
उत्तेजित लोक उभे क्रुद्ध भोवते,
जणु अशांत भद्रकालि बळिच मागते !
राजध्वज खंडित किती पडति खालती
तुकडे नृपसत्तेचे धुळिंत लोळती
पुलक न परि नृपतीचा एक कापतो
विरघळे न हृदय, न मुखिं धर्म थरकतो

या असंख्य दीप्त तप्त लोकलोचनीं
वेन बघे निज निर्भय दृष्टि भिडवुनी
बाहुदंड आघातातुर प्रचंड हे !
घरिं, दारीं, पिंडीं, ब्रह्मांडिं बंड हें !
राजमंत्रि, सेनापति, राजकवी हे
सैनिक हे, क्षुद्र तसे भालदार हे

रमणि कोण, पैल उभी हरिणलोचना ?
अपमानित, निर्वासित नृप-कुलांगना

नाव-गाव ज्यांचें कानीं न कधि पडे
पुरजन ते क्षुब्ध उभे त्यापलीकडे;
सर्व आज न्याय करूं येथ पातले !
त्वेषें नृप हसुनि अधर खंडि आपुले
दंतव्रण कितिहि असो तीव्र नृपा, तो
या अजस्र कालचक्रिं काय उमटतो !
नवघटिका घणवणती तों दिशांतरीं
भालदार येइ पुढे, दे ललकारी :

भालदार :

भालदार ललकार देई भालदार ललकार
महाराज श्रीवेन, जगिं असो तुमचा जयजयकार
देई भालदार ललकार

न्यायदंड दो हातीं धरूनी
जन-आशीर्वच-संमति घेउनि
बैसलास तूं या सिंहासनिं
पुष्पें उधळित अम्ही गर्जलों, तेव्हा जयजयकार

महाराज 'श्रीवेन'! जगिं असो तुमचा जयजयकार
देई भालदार ललकार

राजपथीं शृंखलाबद्ध तूं
उभा जनप्रक्षोभिं आज तू
जळ, ये, ज्वलनीं सुवर्ण हो, तूं
प्रजाघातकी आरोपी तूं, उठते आज पुकार !
महाराज 'श्रीवेन'! जगिं असो तुमचा जयजयकार
देई भालदार ललकार

"प्रजाघाति प्रजाघाति" हाक तों उठे
"सूड, सूड" दशशतमुखिं गर्जना उठे.
"शांत, शांत" म्हणत जनां, कर उभारुनी,
उच्चस्वरिं मंत्रि म्हणे नृपतिलागुनी,
"मंत्र्यांचा बंदिंत तुम्हि न्याय ऐकिला,
जनतेचा, राजन्, अभियोग ऐकिला,
स्वेच्छेने निजराज्यत्याग करोनी
मान्य करा निर्वासन, जा तपोवनीं
हितमंत्र न मंत्र्यांचे ऐकिले तुम्ही,
क्षेम प्रजेचें न कधी राखिलें तुम्ही.
सत्ता हें दिधलें वरदान प्रजेचें!
परिवर्तन केलें दमनांत तियेचें
प्रजाघातिं राजदंड हा नियोजिला,
अधिकार न सत्तेचा तुम्हां राहिला.

मानवतेचा घे अधिकार जर बळी
दडपावा लागे तो बळि रसातळीं!
भिउनि प्रजा दमना जर मूक राहते
तेजोबल-बुद्धि तिची ऱ्हास पावते!
म्हणुनि आज हा नृपते, न्याय मांडिला
जुलुम पाहिजे असाच तो विभांडिला
तेजस्वी अन् स्वतंत्र राहशील तूं!
हे मनुष्य, मानवता प्रथम राख तूं!
दास मानवांस करुनि राज्य नच करीं
रोवीं नच विजयध्वज तूं शवांवरी!
क्षुधितांना द्याया, तव कोष सधन हे
उघड्यांना झाकाया, राजवसन हें
आपदानिवारणास, तुज शरधनु हे
अनिकेता आश्रय, तव सिंहासन हें
दंडाया दुष्ट, राजदंड हस्तकीं
गौरविण्या दीनां हा मुकुट मस्तकीं!
तर नच तूं पाळिलेस, नृप न तूं अता
दंड राजसंन्यासचि एक तुज अता
मान्य न करशिल न्याय अजुनि तर पहा
प्राणदंड आज्ञापी अखिल लोक हा!"

अभिभाषण मंत्र्यांचें सर्व ऐकुनी
स्तब्ध क्षण वेन राहि नेत्र झाकुनी

खदखदुनी राजा मग विकट हासला
संघर्षी खड्गपुंज जणु खणाणला
घनगर्जित-शब्दीं मग वेन बोलला,
"प्राणदंड ! प्राणदंड ! भिववितां मला ?
प्राणदंड कितिदा दुसऱ्यांस अर्पितां
अनुभव तो घ्यावा, मज वाटलें, स्वतां;
इच्छा ती पूर्ण होय दिसत या दिनीं;
खुपलें नच कधिही मज मरणभय मनीं
जगणें मीं जाणियलें जगुनि दाविलें !
मरणें मीं जाणियलें विक्रमें, बळें !
सत्तेचा मीं केला, दास नच असें
राजा मी, नच भिकार जन कुणि असें
हे मानव !—यंत्रें हीं ! मम करांतलीं
योजिन वा मोडिन त्यां, इष्ट त्या स्थळीं
माझ्या ध्येयास लोक सर्व साधनें
नुसती तनु, नच जिवंत मज तुम्ही मनें !
इच्छीं मी, तुम्हि तें केलेंच पाहिजे,
आज्ञापीं, तुम्हि अनुसरलेंच पाहिजे.
सिंहासन तुमच्या तनुचें रचीन मी
अश्रुजळीं तुमच्या मज अभिषेचिन मी !
शय्या ही माझी स्त्रीजात सुंदर
शृंखला परि प्रभातिं जागल्यावर !
राजदंड बनविन जनअस्थि मोडुनी !
मद्य पिइन मी तुमचें रक्त घुसळुनी !

बुबुळांची तुमच्या जयमाळ घालिन !
फडकवीन ध्वज तुमचें चर्म लावुन
नीति काय ? भीति असे; भीरु मी नसें
मानव शब्दास अर्थ कांहिही नसे
अस्तित्व न मानवांस मम जगीं कुठे
मन, कांक्षा, इच्छा, स्वातंत्र्य मग कुठे ?
दुबळ्यांनो, दमन-जुलुम कांहिही म्हणा,
बळ एकच दिव्य ! विफल सर्व त्याविना
राजा हें रूपच अधिकार-बळाचें !
सेवेचें अधिष्ठान, यज्ञहवीचें
नच कुणास म्हणुनी जगिं अग्रमान हा
जिष्णु विष्णु मी, पूजा मजचि, धर्म हा
पत्नी माझीच, मला येइ वधाया,
सेवक तुम्हि सजलां नृपघात कराया
हाच काय धर्म ? कधी मी न पुसे हें
सत्तेचा धर्म हाच, मान्य मला हें !
पराभूत जीवनांत आज मी जरी,
ध्येय, रक्त बदलतें न, आज हें बरी
जन-क्रांति ज्या म्हणतां, बंड तें मला
सत्तेविण निज जीवन मरण तें मला
प्राणभयें जीवनगति मी न बदलितों
'काल-कारण' स्वतःस अजुनि मानितों !"

उत्तर हें ऐसें उद्दाम ऐकुनी
उकळुनिया रक्त जाति लोक खवळुनी
"प्राणदंड, प्राणदंड" हाक एक ही
नभ भेदुनि हालवुनी सोडिते मही
प्रीति, भीति, शांति मनीं कांहिही नुरे
दमनाचा सूड हाच भाव नभिं भरे
उच्चारिति न्याय मंत्रि 'प्राणदंड' हा
हुंकारत, जन धावे तो प्रचंड हा !

उत्तरपथ

उच्चारिति न्याय मंत्रि प्राणदंड हा
हुंकारत, जन धावे तो प्रचंड हा !
श्रीशिवास सर्व जसे त्रिदळ वाहती
लोक नृपा दगडांनी चिणुनि मारिती
फुत्कारति सूडाचे सर्प नभिं जसे
सणसणती दगड पवनिं वाजती तसे
अतिकराल विप्लव जें जनमनीं उठे
हें तुफान त्याचें क्षितिजांतुनी फुटे

राजकवि :

झेल, झेल पाषाण
नृपा, हे झेल, झेल पाषाण
सहा प्रशस्तीपरी, कवीचे आज तुझ्या वाग्बाण
नृपा, हे झेल, झेल पाषाण

स्तुतिसुमनांच्या सुरभित माळा
तुजला, राजन्, अम्हीं अर्पिल्या
आहळुनी निर्माल्य जाहल्या !
फुलें वाहिलीं मींच, प्रथम अन् मीच फेकिं पाषाण
नृपा, हे झेल, झेल पाषाण

भावभक्ति ती तुझ्या प्रजेची
मुखरित अभिलाषा मी त्यांची !

केली अवहेळणा तयाची
फुलां लागते धार शरांची, होय गीत रणगान !
नृपा, हे झेल, झेल पाषाण !

'राजकवी' बिरुदावलि त्यजिली,
छत्री अब्दागिरी मोडिली;
कवी न कविता आता उरली
प्रणवशब्द क्रांतिचा करितसे दिशांतुनी थैमान !
नृपा, हे झेल, झेल पाषाण !

नृपति लोककल्याणा साधन
दमनयंत्र तो बनतां दारुण
जनपददुर्बलता त्या कारण
रुद्रविणा ही वाजे, जागे दिशांतुनी आव्हान
नृपा, हे झेल, झेल पाषाण

असंख्य राज्यें, नृपवंशावलि
अघोर काळानलीं जळालीं !
चिरंतनचि परि जनता उरली !
तिचा कवी मी; या शब्दांतुनि तिचे गर्जती प्राण
नृपा, हे झेल, झेल पाषाण !

राजलक्ष्मी :

प्रिया, नच रमवाया आलें
स्वप्निल तारांकित यामिनीचे रंग नितळ बघ झाले.

पल्लवांत नच वसंतनर्तन
सघन उरोजीं नच मृदुकंपन
व्याकुळतेचे सूर न अधरीं, ताडित हृदय खळाळे
प्रिया नच रमवाया आलें

सुमनहासउल्हास न कुंजीं
नच मधुपांची उन्मद रुंजी
मदिरेची ती चूळ न क्षितिजीं, ज्वाला अरुण उफाळे
प्रिया, नच रमवाया आलें.

कंकणनूपुर नच रुणझुणती
मधुकलशांमधि रस न हिसळती
पथिंच्या बळिचें रक्त पदीं हें! अंगराग नच ल्यालें.
प्रिया, नच रमवाया आलें

दहिवर-भिजली रजनी सरली
तृषा-प्रतीक्षा नयनीं विझली
मी यज्ञानल खंडिताधरीं फुंकरावया आलें
प्रिया, नच रमवाया आलें

रा ज ल क्ष्मी :

शीळ नच कुंजांतुनि नादते
बावरुनी ऐकशी काय?  नच पैंजणझंकार ते

नदींत ना व्याकुळा उर्मिळा
साद वसंता दे न कोकिळा
संकेतापरि संध्याकाळ न ढगांतुनी हासते
शीळ नच कुंजांतुनि नादते

लाज न सांडे पलकीं-गालीं
यौवनपीडा नच कुचयुगुलीं
पथि अवगुंठनिं नवपल्लवसम तनु ही नच थरकते
शीळ नच कुंजांतुनि नादते

चुंबनांत संजीवनि न मिळे
स्त्री नच आलिंगनीं आकळे
बाला अभिसारिका मी न तव, विश्वशांति क्रंदते !
शीळ नच कुंजांतुनि नादते

रा ज ल क्ष्मी :

आठवूं नको ती रात !
स्वर्णकिरणशर सहा, पहा तूं होत विराट प्रभात !

छाया-स्वप्नें विरति; विरूं दे
दहिवर त्यांवर पडति; पडूं दे
मिलन-रात्रिची तृषा न बिंबे सरत्या रातदवांत !
आठवूं नको ती रात !

वक्षीं तव पद कुर्चीं चुरोनी
म्हटलें मी तुज ' देव ' गदगदुनि
आत्मार्पण तें विसर, विसर ती ऊब, मृदुल हृत्प्रांत !
आठवूं नको ती रात !

श्रांत तुझ्या करपाशीं पडलें
स्कंधिं, बाहुवर केश विखुरले
निटिलघर्म चुंबुनि तूं म्हटलें ' देवि ' मला उद्भ्रांत
आठवूं नको ती रात !

हृदयीं झुलवित तुला गाइलें
अश्रु दिले, निःश्वास वाहिले
प्रेमपूजनीं कळलें नाही ती वैऱ्याची रात !
आठवूं नको ती रात

राजलक्ष्मी :

हें दुःख न मज तूं त्यजिलें
नदीपुरावरि आलें मी, अन् नदीपुरावरि गेलें

उच्छृंखल प्रावृषीं लहरलें
फेनिल लाटांवरी वाहलें
असीम रत्नाकर निर्माया जीवन अजुनी उरलें!
हें दुःख न मज तूं त्यजिलें!

मधुर अधर-हास्यापरि आलें
चांदणीपरी झळकूं म्हटलें
परि गालावरि मूक अश्रुपरि पलकांतुनि ओघळलें
हें दुःख न मज तूं त्यजिलें!

होते तव अभिलाषापूर्ती
झालें सुटुनी, सोज्ज्वळ प्रीती
होमज्वाला बनुनि जीवनिं विद्रोहें फुरफुरलें!
हें दुःख न मज तूं त्यजिलें!

आलिंगनपाशांतुनि सुटतां
चुंबनांतुनी अधर निसटतां
कणिंकणिं मधुघट, क्षितिजीं नवकर मज आधारा उढले!
हें दुःख न मज तूं त्यजिलें!

राजलक्ष्मी :

जागतो सूड बघ आज मनीं
प्रलय-जागरण नभीं नृपा, हें प्रातिबोध नच तव वदनीं

ऋषिकन्या मी आश्रमहरिणी
हरिलें मज तूं यज्ञामधुनी
उन्मत्ता, मम करिचें दिधलें होमपात्र तूं भिरकवुनी
जागतो सूड बघ आज मनीं

यौवनधन दो हातीं लुटुनी
भोगदासि मज केलें वंचुनि
यज्ञवेदि विध्वंसुनि जाता जळशिल नच का तूं ज्वलनीं ?
जागतों सूड बघ आज मनीं

मधु सेवुनि, मधुकलश फोडिले
नव रमणीस्तव मजला त्यजिलें
घोर घृणा अपमान साहिले पदर ओढुनी मूकपणीं
जागतो सूड बघ आज मनीं

जीवनधन जनतेचें हरुनी
त्रासिलीस तूं आज मेदिनी
कैवारास्तव स्त्रीच्या आली क्रांतिच बघ ही स्त्री बनुनी !
जागतो सूड बघ आज मनीं

चंद्र नयनिंचे मम मालवले
जराकंप तूं मनिं जागविले
कादंबिनि ती वर्षुनि गेली, तडित्-ज्वलन उरलें गगनीं !
जागतो सूड बघ आज मनीं

बलिरुधिरांनी किती रंगले
किती अश्रुधारांनी भिजले
त्वचुंबित या करीं फेकिले दगड पहा हे सणसणुनी
जागतो सूड बघ आज मनीं

ऋषी :

(हिमालयास उद्देशून)

निज असीम हिममय तपःशांति सोडुनी
हिमनगा, खवळ तूं अग्निगिरी होउनी !

जडभरतापरि तूं स्तब्ध किती बसशिल ?
निर्लज्ज किति युगें उदास तूं बघशिल ?
कां पांडुर झालें रक्त तुझें गोठुनी ?
हिमनगा, खवळ तूं अग्निगिरी होउनी !

ह्या गंगायमुना अश्रुधार वाहुनी
तव व्यथाभार हलका नच्च करितिल कुणी
तूं त्रिनेत्र उघडीं, तुहिनजटा अपटुनी
हिमनगा, खवळ तूं अग्निगिरी होउनी

शशितारामंडित भालवरि गिरिवरा,
अरिलत्ता साहशि किती चंद्रशेखरा
तूं प्रलयतांडवा वीरभद्र, उठ झणीं
हिमनगा, खवळ तूं अग्निगिरी होउनी !

ऋषी :

यज्ञाग्नि अखंडित जागृत हा !

भागिरथीचे स्रोत सोड तूं
ओत अश्रु तूं, वर्ष रक्त तूं
ज्वाला हिमालयाच्या कुशिंतिल विझे न ही कल्पांतिं पहा
यज्ञाग्नि अखंडित जागृत हा !

असंतोष धुमसते प्रजेचे
शाप मूक ते दलित जनांचे
यज्ञवेदिंतुनि जागतात; त्यां राजा, वंदुनि नमुनि रहा
यज्ञाग्नि अखंडित जागृत हा !

शांतिगिरा ऐकिली न ही तूं
ये विद्रोही, आहुति हो तूं
होण्यापूर्वी भस्म, फुलविला नृपा, तुझा अंगार पहा
यज्ञाग्नि अखंडित जागृत हा !

सेनापति :

उलटलें शस्त्र तव तुझ्यावरी !
घाव घेइं क्षत्रिया, छातिवरि, उरे धैर्य जर कांहि उरीं

प्राण आपुले खरुनी खरुनी
समरधीर असिलतेलागुनी
धार तुझ्या लाविली जयांनी
त्या शूरांवर वार काय ? छे, खड्ग लाजतें पहा करीं !
उलटलें शस्त्र तव तुझ्यावरी !

जिवंत तनुच्या अस्थि अर्पुनी
वज्र दिलें तुज ज्या दधीचिंनी
महेंद्र केलें ज्या मनस्विंनी
वज्राहत त्यांनाच करिशि तूं ! घे मग हे अभिशाप शिरीं
उलटलें शस्त्र तव तुझ्यावरी !

ध्वज केला अम्हिं अंग सोलुनी
रंगविला तो निज रुधिरांनी
दिला तुझ्या करिं 'रक्ष' म्हणोनी
मानवतेचा स्वातंत्र्याचा ध्वज तो बुडविशि पायदळीं !
उलटलें शस्त्र तव तुझ्यावरी !

रक्षक जोवर मानवतेचा
तोवर तूं अधिराज आमुचा

सेनाधीश्वर या सेनेचा
फितुर समोरी आज उभा तूं लाथाडुनि जनपदा दुरीं !
उलटलें शस्त्र तव तुझ्यावरी !

मंत्री :

संहारक तूं बनशि नरेंद्रा, जनपदपालनहार

देश अराजकिं रक्षायाला
राजा आम्ही केलें तुजला,
प्रजेवरी तों तूंच उलटला
सहन करील न राजनीति ही अशी भयंकर हार !
संहारक तूं बनशि नरेंद्रा, जनपदपालनहार

श्यामल धरणी, हरित शस्यधन
महार्णवींचें अनर्घ्य मणिधन
दुर्बल दीनांचें जीवनधन
प्रहरी यांचा राजा, लुटिशी तूंच स्वता भांडार !
संहारक तूं बनशि नरेंद्रा, जनपदपालनहार

जोवरि जनता हेतुसिद्धि तूं
सहस्रबाहू, सहस्राक्ष तूं !

करितां परि विश्वासघात तूं
जीर्ण दलासम उडविल तुजला क्षुब्ध प्रजाहुंकार!
संहारक तूं बनशि नरेंद्रा, जनपदपालनहार

मंत्री :

तूं अग्निपथींचा पंथी
राजन्, अग्निपथींचा पंथी
सतत चालणें घर्माश्रूंनी रुधिरीं भिजल्या पंथीं
तूं अग्निपथींचा पंथी

उंच रुखावळि मार्गी असतिल
सघन तयांच्या छाया शीतळ
एकपत्र छायाहि कुठे तूं परि न मागणें, पंथीं!
तूं अग्निपथींचा पंथी

असतिल मनमोहन पडशाळा
सुधामधूच्या पथिं रसशाळा
एक बिंदुचा परी न तेथे तूं अधिकारी, पंथी
तूं अग्निपथींचा पंथी

धरा-गगन तुज दिधलें उसणें
नवें विश्व तूं त्यांतुनि रचणें
देवाचाही ऋणि न रहा, हो तूंच विधाता, पंथी
तूं अग्निपथींचा पंथी

ध्येयमार्ग हा तूं चुकलाशी
ज्वालामुखिविवरीं पडलाशी
तप्त शैल-लाव्हारस-वर्षा सहा, भटकत्या पंथी
तूं अग्निपथींचा पंथी

रथकार[१] :

क्षणभर जुलमा बसूं न देऊं अमुच्या जीवनरथीं
नृपति तो ओढा रे खालती

या कालपथावरि लंघुनि युग-योजनें
ओलांडुनि क्षितिजें अनंत तारांगणें
नव विश्व, भविष्यें नवीं अम्हां शोधणें

१. त्या काळी सिंहासनारूढ होताना राजाला रथकाराची देखील संमती मिळवावी लागत असे; तेव्हा जुलमी राजाला पदच्युत करताना, त्या रथकाराचे उद्‌गारही असेच काहीसे असतील नाही का ?

रोधितो कोण परि गती ?
नृपति तो ओढा रे खालती

अनिरुद्ध गतीचा रथ हा ज्योतिर्मय
त्या आकांक्षांचीं चाकें विद्युन्मय
निज जीवनमार्गें धावतसे निर्भय
स्वातंत्र्यकेतु फडकती
नृपति तो ओढा रे खालती

दलितांच्या दुःखें मिळे रथा या गती
दिक्काल रथाच्या गतींत मग बदलती
अन् धुळींत याच्या स्वर्गंगा उधळती !
चाकांत जुलुम रगडती !
नृपति तो ओढा रे खालती

"प्राणदंड ! प्राणदंड !" लोक गर्जती
चौपथांत चोहिंकडुनि शिला वर्षती
गर्जंत जन उधळत ते स्वैर पसरले
दिग्गज-पदलंगर जणु आज भंगले !
त्राहटि कुणि शंख, कुणी शिंग फुंकिती,
सिंहनाद करित कुणी वीर धावती
अग्निगिरीस्फोटांतुनि शिला उसळती
पुरजन संतप्त तेवि दगड फेकिती

स्त्रिया पळति सांभाळित आपुल्या मुलां
संतापुनि म्हणति, "पडो नृपशिरीं शिला."
मुखिं त्यांच्या क्रुद्ध व्यथा अशी उमटते
धरुनि तप्तरस कुशींत धरणि कापते!
गर्जत जन, उधळत ते स्वैर पसरले
दिग्गज-पदलंगर ते आज भंगले!

राजतनू झाके त्या शिला-वर्षणीं
स्तंभ पडे तो चतुष्पथांत कलथुनी
गुडघाभर शिलाखंडराशि ती अता
कैलासाहूनि उंच दिव्य भारता
प्राणज्योत एक जरी येथ लोपली
मानवता स्वातंत्र्या येथ जागली!

राजगृहांतूनि अजुनि जाळ उसळती
अग्निरसीं मंद सांध्यरंग मिसळती
नक्षत्रें एक-एक नभीं उगवती
धरणीवर शुभ्र रत्नतेज वितरिती
दिवसा जे राजावरि दगड फेकिले
तारे ते रात्रीं गगनांत जाहले!
निष्ठुरता दिवसाची अस्त पावुनी
माउलिच्या पदरापरि रात्र ये जनीं!
आशीर्वच द्याया कर कुणी उभविले
तारांकित तळहातचि गगन पसरिलें!

आशीर्वादापरि अन् देवि सुनीथा
पुत्रशवा शोधाया ये चतुष्पथा
छिन्नभिन्न झालेला पुत्रदेह तो
अंकिं घेइ सारुनिया शिलाभार तो
मृतमुखिंचें रक्त पुशी ती हळू करें
रोधिल परि कोण तिचे नेत्रिंचे झरे ?
देवांनो, स्वर्गाहुनि दिव्य ही मही
मानवता देवत्वाहूनि कठिण ही !

कर्तव्या बळि देउनि पुत्र सकाळीं
अश्रु माय वत्सावरि रात्रिंत ढाळी !
त्या अश्रुंत करुण आर्द्र गीत लहरतें
दग्ध पृथ्वि चिरजीवन त्यांत पावते !

सुनीथा :

बाळ नीज कल्पवरी, नीज सुखें घेई
अंत्यवसन आईचा पदर तुला होई

दमनांच्या ईर्षांनी
पापांच्या स्वप्नांनी
आघातीं वा व्यजनीं

चाळवुनी झोप अता भंगणार नाही !
बाळ, नीज कल्पवरी, नीज सुखें घेई

अत्याचारां बघुनी
तव हनना ही जननि
दगड करीं ये घेउनि
शोकभरें गोठुनि परि हृदय शिला होई !
बाळ, नीज कल्पवरी, नीज सुखें घेई

तव रुधिरांनी भिजुनी
होय वसुमती धरणी !
बघ न, नयन उघडोनी,
जीवनिं तुज दुग्ध दिलें, मरणिं अश्रु घेई !
बाळ, नीज कल्पवरी, नीज सुखें घेई

मरण वरुनि, अभिमानी
वाचविली तूं जननि
उन्नत मी पृथ्विहुनी !
मुक्त कराया भू, मी पुत्र बळी देई !
बाळ, नीज कल्पवरी, नीज सुखें घेई

गर्भभार वागवून
प्रसववेदना सहून
जडदेहीं प्राण भरुन

विश्वा या आश्वासन नित्य देइ आई
नीज, बाळ, कल्पवरी, नीज सुखें घेई

स्थिर राही तूं धरणी
तळप नभा, सूर्यांनी
सिंधु, हास रत्नांनी!
हे मनुष्य, अनिरुद्धा, तूं स्वतंत्र राही!
नीज, बाळ, कल्पवरी, नीज सुखें घेई.

राजगृह पैल उभें धडाधडा जळे
जाळलोळ गोपुरांमधूनि भडकले
ज्वाळा त्या लवलवती, चढति वरिवरि
आहळलें तारांगण दिसत अंबरीं!
सांद्र अग्निरसचि, भवति तेज पसरलें
तम दिशांत रक्तांनी काय नाहलें!
घोंघावत वाऱ्याचा झोत ये जसा
ज्वालांचा तेजोध्वज नभिं डुले तसा!
ठिणग्यांचीं अग्निफुलें उडति भोवती
गुल्मोहर आगीचे मार्गिं बहरती

त्या प्रकाशिं आर्द्र रक्त चमकतें कुठे
दिसती करचरणखंड पसरले कुठे
राजमुकुट वेनाचा लोळतो कुठे
खड्ग कुठे, मणिभूषित बाहुही कुठे

छिन्नभिन्न भ्यासुर प्रेतांमधी कुठे
अर्धमृतचि जीव कुणी विव्हळुनी उठे !

सोसाटत वारे फिरफिरुनि वाहती
अग्निपताका ज्वलंत गगनिं फडकती
पुष्पवृष्टि ठिणग्यांची सतत चालते
रक्ताळित वाट निखाराच तळपते !
ज्वालेपरि पसरत मुरडूनि वळतसे
क्रांतिचाच जणु असीम अग्निपथ असे !
या पथिंचे पथिक पहा येति चालत
नवयुगिचें उदयगान गात गर्जत
क्षिति नच त्यां रुधिरांची सांडल्या असे
चिंता नच जखमांची त्यां मुखीं दिसे
जखमांतुन बिंबित जय भावि पाहती !
बांधुनि पाठीस मृत्यु मार्ग चालती

जनता :

*सर्व :*

करूं तिथे आघात
पहिला करूं तिथे आघात
चला रे, करूं तिथे आघात

स्वर्गांतुनि दुबळ्यांवर घडतो जेथे वज्राघात
पहिला करूं तिथे आघात!

*पहिला :*

'शिव' नयनांना बघूं न देती
'सत्य' वाणिला वदूं न देती
प्रगतीला शृंखला घालिती
मानवतेस्तव वळती जेथे फास मानवी हात!
पहिला करूं तिथे आघात!

*दुसरा :*

ज्यांच्या श्रमजळिं नभिं घन भरले
धान्य जयांच्या तपनीं पिकलें
यश ज्यांच्या मरणांत जन्मलें
गुलाम त्यांना करिती जेथे तयांच्याच देशांत!
पहिला करूं तिथे आघात

*तिसरा :*

राजगृहांसह, धर्ममठांसह
नगरपुरांसह, साम्राज्यांसह
शत-शत राजांसह, देवांसह
ब्रह्मांडाचा भार वाहि त्या शिरीं मारिती लाथ!
पहिला करूं तिथे आघात!

*सर्व :*

चला रे करूं तिथे आघात !
स्वर्गांतुनि दुबळ्यावर घडतो जेथे वज्राघात!
पहिला करूं तिथे आघात!

क्रांति-पुरुष तेच आज या पथाहुनी
दग्ध राजसभास्थानीं जाति धावुनी
लाथेने राजपुरुषतनु झुगारुनी
रडत्या नृपमातेला पैल सारुनी
जळत्या त्या महाद्वारगोपुरावरी
जनसत्ताध्वज उभविति लोक निजकरीं
ज्वालेसह ज्वालेपरि नव निशाण तें
फडफडतें, भासे नवयुगचि अरुणतें !

भ्यासुर निज पुत्रदेह कवळुनी उरीं
दीन राजमाय रडे चौपथावरी !
श्वान कुठे विव्हळे प्रेतास फाडुनी
घुत्कारे घुबड वृक्षसावल्यांतुनी
जीर्ण जगत् हें रडतें त्यास रडूं द्या !
पोखरलें कुजकें ब्रह्मांड फुटूं द्या !
जून जगाची दांडी तुटे वाकुनी !
कोसळते जीर्ण धरणि अक्षभंजनी !

हा विनाश, क्रंदन हें कोण पाहतें
नवयुग या प्रलयरात्रिमधुनि दिवसतें!
ध्वस्त गोपुरीं ध्वज जन म्हणुनि उभविती
संहारक्रंदनिं युगगीत गर्जती

जनता :

ध्वज आज नवा उभवूं
कपोतबाळें रक्तपिपासू श्येनाशीं लढवूं
ध्वज आज नवा उभवूं

निशाण जुलुमाचें, दमनाचें
चिन्ह आमुच्या परवशतेचें
बलोद्धतांच्या गर्वपताका पायदळीं तुडवूं
ध्वज आज नवा उभवूं

रम्य भविष्याच्या स्वप्नापरि
तेव्हा प्रलयविजांच्या घडिपरि
ध्वज डोलूं द्या, साउलींत त्या नव पाइक जमवूं
ध्वज आज नवा उभवूं

REFBK-0025332
REFBK-0025332

वसन ध्वजाचें विश्वशांतिचें
रंग पदाहत आकांक्षांचे
असंतोषज्वालेपरि फडफड युगपल्लव उडवूं !
ध्वज आज नवा उभवूं !

राजाचें सिंहासन उलथे
धरणि फुटुनि तारांगण कलथे
ढासळलेले बुरुज जगाचे अग्निफुलीं फुलवूं !
ध्वज आज नवा उभवूं

प्रतिकारा तृणपातें उठलें
आसन इंद्राचें हादरलें
वज्राशीं झुंजण्या बाहुल्या मातीच्या सजवूं !
ध्वज आज नवा उभवूं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे